
# परिक्रमा



# परिक्रमा

कव्हर ४ वरील पर्तगाळ येथील जुन्या मठवास्तूचें रेखाटन पोर्तुगीज सरकारच्या जुन्या दस्तैवजांतून घेतलें आहे.

# परिक्रमा

लेखक
चंद्रकांत शांताराम केणी

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ समिती

PARIKRAMA

प्रथमावृत्ति
चैत्र शु. २, शके १९२२
६ एप्रिल, २०००

अक्षर-जुळणी व मुद्रक
सुरेश तिमाजी शणै काकोडकार
ओमेगा एन्टरप्राइझेस्
११५८, विद्यानगर, मडगांव - गोवा ४०३ ६०१

प्रकाशक
चंद्रकांत शांताराम केणी
सचिव, श्रीसंस्थान् गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ समिती
पर्तगाळ, काणकोण - गोवा ४०३ ७०२

मूल्य : रु. ५०/-

# इतिहासाचीं चाळतां पाने...

सारस्वत समाजाच्या अस्मितेचा प्राणरक्षक मानदंड असलेल्या श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या संस्थापनेला विक्रम संवत्सरातील चैत्र शुद्ध द्वितीया, शके १९२२ रोजी, ५२५ वर्षे पूर्ण होत आहेत, याचा सकल सारस्वत समाजाला सार्थ अभिमान वाटेल. ५२५ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडात या मठाने केलेल्या समाज संघटनाच्या कार्यामुळेच पोर्तुगीज राजवटीत धर्मच्छळाचा मुकाबला करून देखील सारस्वत समाज आपलें स्वत्व व स्वाभिमान अभंग राखूं शकला. देवालये उध्वस्त झाली असता मठाने समाजाच्या मनात वसत असलेल्या तेजस्वितेच्या सुप्त अंशाला फुंकर घालून तो प्रज्वलित केला आणि मंदिरांचे नवनिर्माण करून संस्कृति विकासाचे कार्य अव्याहत चालू ठेवले. या ५२५ वर्षांच्या काळात श्रीमठाला तेवीस स्वामींची अखंडित परंपरा लाभली व या स्वामींनी आसेतु हिमाचल पुण्यसंचार करून धर्म व अध्यात्माचा प्रचार व प्रसार केला. या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर श्रीमठाचे संस्थापक श्रीमद् नारायणतीर्थ स्वामी महाराजांनी संन्यास दीक्षा घेतलेली तिथी ही मठ संस्थापनेची तिथी मानून श्रीमठाचा सपाद पंचशताब्दि महोत्सव साजरा होत आहे. या निमित्ताने पर्तगाळ येथे ईशान्यप्लवा कुशावती नदीच्या तीर्थक्षेत्री श्रीरामदेव सान्निधींत विशाल सारस्वत संप्रदायाच्या प्रतिनिधींचे विराट स्नेहमीलन व्हावे या दृष्टीने त्रिविध उपक्रमांचा हा एक महोत्सव आयोजित करण्यात आलेला आहे. पांच दिवसांच्या या महोत्सवाचा आरंभ २ एप्रिल २००० रोजी होणार असून विक्रम संवत्सराच्या (शके १९२२) चैत्र शुक्ल द्वितीयेस म्हणजे दि. ६ एप्रिल २००० रोजी सांगता व्हावयाची आहे. या निमित्त सारस्वत समाजाच्या विविधतेत अंगीभूत असलेल्या एकतेचे जगाला दर्शन घडणार आहे.

त्रिविध कार्यक्रमांमध्ये सपाद पंचशताब्दि उत्सवाशिवाय मानवतेच्या कल्याणाच्या उद्दिष्टाने सारस्वत समाजाची एकता व तेजस्विता यांच्या अभिवृद्धिप्रीत्यर्थ शतकोटि श्रीरामनाम जप महायज्ञ आयोजित करण्यात आला आहे. या सुलभ जपाच्या उच्चाराने वातावरणात निर्माण होणारी आंदोलने दिव्यत्वाची प्रचीति देणारी ठरणार आहेत. जप महायज्ञाची सांगता नवनिर्मित व विस्तारीत पर्तगाळ मठवास्तूच्या प्रांगणात होणार असून या महायज्ञात सारस्वत समाजाच्या सर्व थरातील व सर्व भागातील घटकांचा सहभाग असणार.

तिसरी सुखद व योगायोगाची गोष्ट ही की यंदाची चैत्र शुद्ध द्वितीया ही विद्यमान मठाधीश श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी यांच्या गुरुपीठारोहणाची रजत जयंती असल्याने या महोत्सवाचे महत्त्व अधिक उत्तुंग झाले आहे. त्यातही आपल्या पंचवीस वर्षांच्या दैदीप्यमान कारकिर्दीत श्रीस्वामीजींनी समाजामध्ये अभूतपूर्व जागृती व चैतन्य निर्माण केले, मठ-मंदिराचे जीर्णोद्धार व नूतन वास्तूंची निर्मिती करण्याबरोबरच श्रीमन्न्यायसुधापाठाची यशस्वी परिपूर्ति करून स्वाध्यायाची उत्तुंगता गांठली आणि शाळिग्राम क्षेत्रातील ऐतिहासिक गंडकी यात्रा करून पुण्यतेज प्राप्त केलेले असल्याने रजत जयंती उत्सवाला आगळे महत्त्व प्राप्त होत आहे.

विशेष म्हणजे या भव्य-दिव्य महोत्सवाला सारस्वतांच्या चार प्रमुख पीठांचे मठाधीश उपस्थित राहून समाजाला संदर्शन व आशीर्वचनाचा लाभ देणार आहेत. म्हणूनच हा कपिलाषष्ठीचा योग म्हणावा लागेल.

या महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी मठाच्या इतिहासाची एक धांवती परिक्रमा करणे अप्रस्तुत ठरणार नाहीं.

## वारणासी क्षेत्रांत सारस्वत मठ

श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ या नांवाने ख्याति पावलेल्या श्रीगुरुपीठाची संस्थापना खऱ्या अर्थाने हिमालयांत बद्रिकाश्रम येथें चैत्र शुक्ल २ या शके १३९७ या दिवशीं योगायोगाने झाली. मध्व संप्रदायाच्या द्वैत तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं श्रीमध्वाचार्य यांनी उडुपी येथें अष्टमठ स्थापन केले होते. या अष्टमठांपैकीं फलमारु मठ हा एक होय. पश्चिम भारतांत विखुरलेला वैष्णव संप्रदायाचा सारस्वत समाज या मठाचें अनुयायित्व पत्करून बसला होता.

फलमारु मठाचे दहावे आचार्य श्रीरामचंद्रतीर्थ हे हिमालयांत तीर्थ यात्रेला परिवारासह गेले असतां बद्रिनाथ येथें अचानक आजारी पडले. दुर्गम प्रदेश आणि उडुपीपासून सुदूर अशा हिमालयांत असल्याने मूळ मठाशीं संपर्क साधणेंहि शक्य नव्हतें. श्रीरामचंद्रतीर्थांनी असा विचार केला की जर श्रीनारायण सान्निध्यांत आपणास मुक्ति मिळाली तर फलिमारु मठाची परंपरा खंडित होईल. एक पर्यायी व्यवस्था असावी असा विचार करून त्यांनी परिवारासमवेत यात्रेला आलेल्या गौड सारस्वत ज्ञातींतील माधव नांवाच्या एका ब्रह्मचाऱ्याला रीतसर संन्यासदीक्षा दिली व त्यास श्रीमन्नारायणतीर्थ असे नामाभिदान दिलें आणि शेष तीर्थयात्रा पूर्ण करून आपली प्रतिक्षा न करतां उडुपीला परतण्याचा सल्ला दिला.

संन्यास व्रताची दीक्षा घेतल्यानंतर उत्तर भारतांतील तीर्थाटनाचा संकल्प पुरा

करूनच उडुपीला परतण्याचा विचार श्रीनारायणतीर्थांनी केला आणि कुरुक्षेत्र, ब्रह्मावर्त, ब्रह्महृद अशीं तीर्थक्षेत्रें करीत करीत ते त्रिभुवनांत सुप्रसिद्ध असलेल्या वारणासी क्षेत्रांत दाखल झाले. वारणासी हें एक आद्य वैष्णव स्थान असून भगवान् माधवाचें तें निवासस्थान असल्याची आख्यायिका श्रीनारायणतीर्थांनी पुराणांत वाचली होती. कार्तिक मास जवळ येऊन ठेपला आहे आणि कार्तिक मासांत पंचगंगा घाटावरील स्थानाला अनन्य साधारण महत्त्व आहे याचीहि त्यांना कल्पना होती. प्रभु रामचंद्र वनवासाला निघाले त्यावेळीं वर्षभर वारणासी क्षेत्रांत त्यांनी वास्तव्य केले याचा रामायणांतील उल्लेखहि त्यांच्या स्मरणांत होता.

श्रीनारायणतीर्थ पंचगंगा घाटाच्या त्या काळांतील प्रशांत वातावरणाने मुग्ध झाले. आनंद रामायणांतील एक श्लोक त्यांना मुखोद्गत होता. त्यांनी मनांतल्या मनांत तो श्लोक उच्चारलाः

**तथा चकार रामोऽपि घट्टबंधनमुत्तमम्।**
**दृश्यते प्रत्यहं यत्र काश्यां रामः ससीतया।।**
**चकार पंचगंगायां कार्तिकस्नानमुत्तमम्।**
**काशीवासं वर्षमेकं चकार धर्मतत्परः।।**

(आनंद रामायण २/६/३७-३८)

श्लोकाच्या उच्चारणाबरोबर सर्वांग रोमांचित झालें. श्रीरामचंद्राच्या पादस्पर्शाने पावन झालेल्या या पुण्यक्षेत्रांत कांहीं काळ ध्यान-चिंतन-मननांत व्यतीत केला तर उर्वरित आयुष्यांत समाजसेवेसाठीं आवश्यक असलेल्या सद्सद्विवेक बुद्धीचा सुलभपणे विकास होईल असेंहि त्यांच्या मनाने घेतलें. तासन् तास ते पंचगंगा घाटावर गंगामातेच्या अखंड प्रवाहाच्या विविध छटा न्याहाळीत ध्यानस्थ बसायचे. तिन्ही प्रहरीं गंगास्नान करावे आणि शेष वेळ आपल्या वैयक्तिक आध्यात्मिक साधनेंत व्यतीत करावा असा त्यांचा शिरस्ता होता. घाटाच्या पायथ्याशीं, गंगा-यमुनेच्या त्रिवेणी संगमांत किरणा व धूतपापा या नद्यांचे भूगर्भांतून वहात आलेले प्रवाह याच ठिकाणी आपलें तीर्थ गंगार्पण करतात. सारेंच अद्भुत होतें. या ठिकाणीं आपल्या संप्रदायाची एखादी मठवास्तु उभी होऊं शकली तर वारणासी पुण्यक्षेत्रीं गौड सारस्वत ब्राह्मण समाजाला हक्काचें घर मिळूं शकेल अशी कल्पना मनांत घोळत होती.

कार्तिक मास सुरू झाला आणि पंचगंगा घाटावरील भाविकांची गर्दी वाढूं लागली. कधीं कधीं माणसांचे थवेच गंगातटीं येऊन दाखल होत. भाविकांच्या गर्दीमुळें श्रीनारायणतीर्थांच्या एकांतांत विक्षेप आला. घाटाच्या एका बाजूने विशेष गर्दी नसायची. तें स्थान काशी नरेशाच्या कुटुंबियांसाठीं राखून ठेवण्यांत आलें होतें.

राजघराण्यांतील मंडळी आपल्या लवाजम्यासह त्या ठिकाणीं यायची आणि इतर भाविकांच्या कोलाहलापासून बाजूला असलेल्या पंचगंगा घाटाच्या एका कोपऱ्यांत स्नान करून परतायची. नरेशाच्या कुटुंबाचा विशेष उपसर्ग पोंचत नव्हता त्यामुळें आपल्या नेहमींच्या कोपऱ्यांत बसून ध्यान, चिंतन, मनन व जपानुष्ठान श्रीनारायणतीर्थ अबाधित ठेवूं शकले.

कार्तिक महिन्यांतीलच गोष्ट. राजकन्या आपल्या सख्या व दासींसमवेत गंगास्नानाला आली. अंगावरचे मौल्यवान अलंकार उतरवून नदी किनारीं वस्त्रांवर ठेवले. नेहमीचाच तो रिवाज.

त्या दिवशीं थंडी विशेष होती. गार वारे चौफेर वाहात होते. आकाशांतील सूर्याची उन्हें देखील चांदण्या सारखी शीतल भासत होतीं. राजकन्येने गंगापात्रांत डुबकी घेतली आणि तिच्या अंगांत हुडहुडी भरली. लगबगीने किनाऱ्यावरील कोरडे वस्त्र ओढून घेतलें.

हळुहळू सारी मंडळी स्नान आटोपून राजवाड्यांत परतायची तयारी करताना लक्षांत आलें कीं राजकन्येची वज्रजडित बांगडी हरवली आहे. नुकतीच काढून ठेवलेली बांगडी जाणार कुठें? शोधाशोध सुरू झाली. भर दिवसा राजकन्येची वज्रजडित बांगडी चोरण्याचें साहस करवलें तरी कोणाला? राजाचे शिपाई बांगडीच्या शोधासाठीं बाहेर पडले.

घाटाच्या एका कोपऱ्यांत एक संन्यासी जपानुष्ठानाला बसलेला त्यांना दिसला. अनेकांनी या परदेशस्थ संन्याशाला तेथें पाहिलें होतें. राजकन्येचा अलंकार हरवल्यामुळें मोठा कोलाहल झाला तरी श्रीनारायणतीर्थांच्या ध्यानांत व्यत्यय आला नाहीं. पण शिपायांनी येऊन त्यांच्या ध्यानाचा भंग केला आणि राजकन्येच्या हरवलेल्या बांगडीची माहिती देऊन त्या परदेशी संन्याशावर वहीम असल्याचें बोलून दाखविलें.

"सर्वसंग परित्याग करून संन्यास व्रताचा स्वीकार केलेल्या आम्हा संन्याशांना धन-अलंकाराचें प्रलोभन असण्याचें कारणच नाहीं. जेथें आम्ही दोन प्रहरच्या घासाची पर्वा करीत नसतों, तेथें स्वीकृत असंग्रह व अस्तेय व्रताशीं द्रोह करून संन्यास धर्माशीं प्रतारणा कां बरे करणार?"

श्रीनारायणतीर्थ यत्किंचितहि विचलित झाले नाहींत. पण त्यांची प्रांजळ भाषा शिपायांना समजली नाहीं व त्यांनी संन्याशाची झडती घेतली. झडतींत कांहीं सांपडले नाहीं तेव्हां शिपाई हिरमुसले. दरम्यान काशी नरेशांचे वरिष्ठ अधिकारीहि घटना स्थळीं येऊन दाखल झाले होते. एका निरुपद्रवी संन्याशाचा संशयावरून छळ होत आहे हें त्यांना पाहवेना. त्यांनी हस्तक्षेप केला तेव्हां श्रीनारायणतीर्थ सस्मित मुद्रेने

म्हणाले, "आम्हाला मनस्ताप झाला याचे वैषम्य वाटून घेऊं नका. उलट संशयाचें परिमार्जन झालें याचा आम्हाला संतोष आहे. पण किंचित व्यावहारिक दृष्टिकोनांतून विचार करा. वज्रजडित बांगडी घसरत घसरत गंगापात्रांत जाऊन पडूं शकते. गढूळ पाणी निवळल्यावर शोध घेतल्यास मिळूं शकते. आमच्यापुरती आम्ही गंगेच्या साक्षीने अशी प्रार्थना करतों कीं अशा भौतिक धनाचा मोह आम्हाला नाहीं आणि तो कधीं होऊं नये".

श्रीनारायणतीर्थांच्या निरपराधित्वाबद्दल अधिकाऱ्यांच्या मनांत संदेह राहिला नाहीं. त्यांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे घाटानजिक गंगापात्रांत शोध घेतला व बांगडी सांपडली. राजघराण्यातील मंडळीने श्रीनारायणतीर्थांची माफी मागितली आणि एका दिव्यांतून पार पडल्याचा सुस्कारा स्वामीजींनी सोडला. त्यांच्यापुरते तें प्रकरण तेथें संपलें होतें.

परंतु एका निरपराध संन्याशाची राजसत्तेनें आगळीक केली ही गोष्ट काशी नरेशाच्या कानावर गेली. या प्रमादाचें प्रायश्चित्त घेतलें पाहिजे असें त्यांच्या मनाने घेतलें व ते तडक पंचगंगा घाटावर येऊन श्रीनारायणतीर्थां समोर नतमस्तक झाले.

"जें घडलें त्या प्रकारामुळें आम्ही लज्जित झालों आहोंत. स्वामीजींनी आम्हाला क्षमा करावी." अशी नरेशाने प्रार्थना केली.

श्रीनारायणतीर्थांनी हंसून काशी नरेशांच्या मस्तकावर हात ठेवला व म्हटलें, "झालें गेलें विसरून जा. आमच्या मनांत कसलेंच किल्मिष नाहीं."

वारणासी क्षेत्रांत नित्यशः हजारों साधुसंन्यासी विहार करत असतात. पण दैवाने श्रीनारायण तीर्थांच्या चरणापाशीं काशी नरेशांना आणलें होतें. क्षेमकुशल व वास्तपूस झाली. आपल्या हातून स्वामीजींची अल्प सेवा घडावी अशी इच्छा नरेशांनी व्यक्त केली.

श्रीनारायणतीर्थ म्हणाले, "तुमच्या राज्यांत धर्म व धार्मिकतेला नेहमी उदार आश्रय मिळत आलेला आहे. या पंचगंगा घाटाजवळ गंगामातेने प्रवाहाची दिशा बदलून ती ईशान्यप्लवा झाली आहे. आम्ही सुदूर अपरांत प्रांतांतील गौड सारस्वत ब्राह्मण, पण आमच्या मनांत काशी क्षेत्रांतील गंगामैयाबद्दल आकंठ भक्ति भरलेली आहे. आमच्या समाजाचे लोक अधिकाधिक संख्येने या ठिकाणीं पोंचावे, जगन्मातेचें त्यांना दर्शन घडावें, ईशान्यप्लवा प्रवाहामध्ये पुण्यस्नांन करण्याचें भाग्य त्याना मिळावें यासाठीं एक मठवास्तु उभी करावी अशी आमची मनोकामना आहे. याकामीं नरेशांनी आस्था दाखविली तर तें एक पुण्यकार्य ठरू शकेल."

पश्चात्तापदग्ध झालेल्या काशी नरेशांना श्रीनारायणतीर्थांच्या उद्गारांनी शांतता

मिळाली. त्यानीं त्याच घाटावर बिंदुमाधव मंदिराच्या सन्मुख ईशान्यप्लवा गंगेच्या तीरावर एक मठ बांधवून घेतला आणि त्या ठिकाणीं पंचधातुमय श्रीलक्ष्मीनारायणाच्या प्रतिमेची विधिवत् प्रतिष्ठापना करून श्रीनारायणतीर्थांनी नित्य पूजाअर्चेची व्यवस्था केली आणि काशीहून ते परतले.

सारस्वत ब्राह्मण वैष्णव परंपरेंतील हा पहिला मठ होय.

काशी येथें श्रीमठाची स्थापना केल्यानंतर श्रीनारायणतीर्थ उडुपीला परत आले तोंवर असाध्य मानल्या जाणाऱ्या आजारांतून त्यांचे गुरुवर्य श्रीमद् रामचंद्रतीर्थ बरे होऊन स्वीय मठांत परतले होते. श्रीनारायणतीर्थांना पाहून गुरुस्वामींची मनःस्थिती द्विधा झाली. तीर्थयात्रेंत ज्यांनी आपली उत्तम सेवा केली व संन्यासदीक्षा घेतल्यानंतर श्रीवारणासी क्षेत्रांत आपली पताका रोवून जे परतले, त्या नारायणतीर्थांचे कार्यक्षेत्र कसें ठरवायचें? उडुपी येथें त्यांनी नेमस्त केलेल्या श्रीविद्यानिधीतीर्थांकडे पीठाधिकार जाणे हें मठानुयायी द्रविड ब्राह्मणांना हवे होते. त्या मठाची तीच परंपरा होती. त्यानी श्री विद्यानिधीतीर्थांची उत्तराधिकारी म्हणून नियुक्ति केली आणि श्री नारायणतीर्थांना गौड सारस्वत ब्राह्मण समाजाचें संघटन करून स्वतंत्र मठ परंपरा निर्माण करण्याचा सल्ला दिला. उडुपीहून श्रीनारायणतीर्थ भटकळ येथें आले आणि त्यांनी तेथे एक मठवास्तु उभी करून सारस्वत समाजामध्यें धर्मकार्यास आरंभ केला.

सर्वप्रथम श्रीनारायणतीर्थांनी परशुराम भूमीचा विस्तृत दौरा केला. उत्तर भागांत गोमंतक प्रांतांतील परिस्थितीची पहाणी केल्यानंतर ते दक्षिण भारताच्या दौऱ्यावर गेले. सर्वत्र गौड सारस्वत समाजाच्या लोकांनी त्यांचें भव्य-दिव्य स्वागत केलें. हा दौरा मठवास्तु उभारण्यापेक्षांहि आपण स्वीकारलेल्या तत्त्वज्ञानाचा प्रचार-प्रसार करण्याच्या दृष्टीने होता. दक्षिण कर्नाटकांत, केरळांत, उडुपीपासून त्रावणकोरपर्यंत संचार करून ते परतले व पुन्हा गोमंतकापर्यंत संचार करून वैष्णव संप्रदायाने स्वीकारलेल्या द्वैत मताचा प्रचार केला. श्रीमध्वाचार्य यांच्या जीवन व शिकवणीचा सखोल अभ्यास करून त्यांनी त्यांचे विचार अत्यंत प्रभावीपणे समाजासमोर मांडले. नंतर श्री वासुदेवतीर्थ यांचा शिष्य म्हणून स्वीकार करून मठपरंपरा पुढे चालविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोंपविली.

श्रीरामचंद्रतीर्थांचे पट्टशिष्य श्रीदिग्विजय रामचंद्रतीर्थ होत. गुरुपीठावर आरूढ होण्यापूर्वींच आपल्या कार्यशक्तीचें दर्शन त्यांनी समाजाला घडविलें होतें. गोकर्ण तीर्थस्थानाच्या उत्तरेला पदयात्रा करीत ते अंकोला येथें पोंचले. गांवांत स्वामीजींचें उत्फूर्त स्वागत झालें आणि त्या सत्संगाची परिणती अंकोला येथें नूतन मठ १६४९ सालीं बांधण्यांत झाली. या मठांत वीरविठ्ठलाची प्रतिमा स्वामीजींनी स्थापन केली.

सुरुवातीलाच स्वामीजींनी समाज बांधवांना जाणीव करून दिली की मठवास्तू बांधणे सुलभ असतें. परंतु या वास्तूचें मांगल्य व पावित्र्य टिकविण्याचें कार्य अवघड असतें. गांवच्या लोकांनी या नव्या मठांत नित्य निरंतर पूजाअर्चा चालवायची झाल्यास त्यासाठीं मठाला स्वतःच्या भरवंशाचे उत्पन्न असावें लागेल. भाविक तत्परतेने पुढें आले व त्यानी शेती व बागायती मठाला अर्पण करून अंकोला येथील मठाला स्थैर्य प्राप्त करून दिलें. त्यावेळीं श्रीरामचंद्रतीर्थ पीठावर होते. आपल्या प्रिय शिष्यांची बुद्धिमत्ता व चातुर्य पाहून ते आनंदित झाले. मठाचा कारभार यापुढें सुरक्षित हातांत जाणार याची त्यांना खात्री पटली. त्याच बरोबर वारणासी येथील मठ आपल्या हातून निसटणार याची सखेद चिंता त्यांना लागून राहिली होती. शिष्याच्या कर्तृत्वापासून प्रेरणा घेऊन आपणहि एक मठ उभारला पाहिजे, जो वारणासी क्षेत्रांतील पंचगंगा घाटावर ईशान्यप्लवा गंगानदीच्या किनारीं असलेल्या आद्य मठाला सर्व दृष्टींनी तुल्यबळ ठरेल आणि त्या मठाला मुख्यालयाचा दर्जा देतां येईल. या विचाराने भारून गेलेले श्रीरामचंद्रतीर्थ यांना पर्तगाळीच्या घनदाट वनांत निळ्या-काळ्या सह्य पर्वत रांगांच्या पायथ्याशीं ईशान्यप्लवा कुशावतीच्या सान्निध्यांत देव-वास्तव्यास अनुकुलता दिसून येतांच त्यानी तें स्थान मठबांधणीसाठीं निवडलें आणि तत्काळ वास्तुनिर्मितीच्या कार्यास आरंभ केला.

श्रीरामचंद्रतीर्थ यांची कारकीर्द परंपरेला साजेल अशीच होती. तत्पूर्वी मठाच्या इतर स्वामीजींनी भरीव कार्य केलें होतें. वारणासी येथील मठाशिवाय वारणासीहून दक्षिणेला परतल्यावर भटकळ येथे मठ स्थापन केला होता. भटकळ येथें स्थापन झालेलें धर्मपीठ हें दक्षिणात्य सारस्वतांचें आद्य गुरुपीठ मानलें जातें. भटकळ येथेंच गोपीनाथ नदीच्या किनारीं श्रीनारायणतीर्थांचे महानिर्वाण झालें. आज त्या ठिकाणीं त्यांचें वृंदावन आहे.

श्रीवासुदेवतीर्थ हे श्रीनारायणतीर्थांचे शिष्य. त्यांची कारकीर्द अल्पकाळाची होती. परंतु श्रीजीवोत्तमतीर्थांना आश्रम देऊन स्वतः अध्यात्मसाधना व तीर्थयात्रा करीत पंढरपूर येथें भीमातीरीं वृंदावनस्थ झाले. त्यांच्या कारकीर्दीतील सर्वांत मोठी सिद्धि म्हणजे त्यांनी श्रीजीवोत्तमतीर्थांना दिलेली संन्यास दीक्षा होय. श्रीजीवोत्तमतीर्थांची कारकीर्द अत्यंत उज्वल व अविस्मरणीय होती. आसेतु-हिमाचल यात्रा त्यांनी केल्या आणि या यात्रांची काव्यबद्ध नोंदहि ठेवली. गंडकी परिसराची यात्रा केलेले ते पहिले धर्मगुरु मानले जातात. याच यात्रेंतून श्रीजीवोत्तमतीर्थांनी विठ्ठलाच्या तीन मूर्ति आणवून त्यांची बसरूर व गोकर्ण मठांत प्रतिष्ठापना केली व त्यांना अनुक्रमें दिग्विजय विठ्ठल व भूविजय विठ्ठल अशीं नांवें बहाल करून तिसऱ्या विठ्ठलाला मठ

परंपरेतील स्वामीजींच्या देव्हाऱ्यांत ठेवून घेतले. या विठ्ठलाचें नांव त्यांनी वीरविठ्ठल असे ठेवून घेतलें. श्रीजीवोत्तमतीर्थ यांचा अध्यात्म विद्येतील अधिकार फार मोठा होता. त्यांची ज्ञान साधना व योगसाधना असामान्य होती. त्यांनी आपल्या प्रासादिक प्रवचनाद्वारे लोकहृदये जिंकलीं व आपल्या ग्रंथ निर्मितीद्वारे भल्याभल्या पंडितांनाहि चकित करून सोडलें.

श्रीपुरुषोत्तमतीर्थ आपल्या गुरुप्रमाणेच विद्वान् होते व कर्मकांडाबद्दल फारच जागरूक होते. पण त्यांची कारकीर्द फारच अल्प ठरली. ते एक वर्ष देखील गुरुपदावर राहिले नाहींत. परंतु त्यांचे पट्टशिष्य श्रीअणुजीवोत्तमतीर्थ (शके १५१० ते १५६०) यांची पन्नास वर्षांची कारकीर्द ही गोव्याच्या इतिहासांतील दुर्धर कसोटीच्या काळांतील होती. स्थलांतरित सारस्वत समाजाचें पुनर्वसन करण्याच्या कार्याला त्यांनी प्राधान्य दिलें. सासष्टी व बार्देशमधून स्थलांतरित झालेल्या सारस्वत बांधवांसाठीं त्यांनी मठ उभारणी केली व डिचोली येथील मठांत ते समाधिस्त झाले. या पार्श्वभूमीवर श्रीरामचंद्रतीर्थांची कारकीर्द अत्यंत उर्जस्वल ठरल्यास आश्चर्य नाहीं.

श्रीदिग्विजय रामचंद्रतीर्थ यांनी अधिकांश काळ पर्तगाळ मठांतच घालविला आणि त्या मठांतच श्रीरघुचंद्रतीर्थ यांना संन्यास दीक्षा देऊन त्याना आपले पट्टशिष्य बनविलें. श्रीदिग्विजय रामचंद्रांचें वृंदावन अंकोला येथें आहे. दिग्विजय रामचंद्रतीर्थांचे थोरले शिष्य श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ तसेच श्रीसंयमींद्रतीर्थ व श्रीव्यासतीर्थ असे हि शिष्य होते.

परंपरेतील प्रत्येक स्वामीजींच्या कार्याचा सविस्तर आढावा घेण्याचा मोह स्थलसंकोचास्तव आवरून परंपरेतील कांहीं अत्यंत तेजस्वी व पुण्यवंत स्वामीजींचें स्मरण तेवढे करतों. अंगांत ज्वर असतांनाहि नित्यपूजेत खंड पडूं नये यासाठीं अंगांतील ज्वर योगविद्येच्या आधारें दंडावर ठेवून श्रीवीरविठ्ठलाच्या पूजेंत खंड पडणार नाहीं याची दक्षता घेतलेले श्रीमठ परंपरेतील अकरावे स्वामी श्रीमत् श्रीकांततीर्थ यांची कारकीर्द समाज संघटनेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरली आणि त्यांचें अपुरें कार्य पूर्ण करण्याचे काम श्रीभूविजय रामचंद्रतीर्थ (१४) यांनी केलें. पट्टशिष्य श्रीरमानाथतीर्थ यांच्या हातीं मठाचीं सूत्रें सोपवून ते तीर्थयात्रा करीत. त्यांच्या उद्गारांना मंत्रशक्ति प्राप्त झाल्याची प्रचीति अनेकदां आलेली आहे.

अल्पवयांत पीठावर आलेले श्रीलक्ष्मीनाथतीर्थ यांची कारकीर्द फारच गाजली. त्यांचे शिष्य श्रीआनंदतीर्थ यांनी सर्व मठांना आर्थिक स्थैर्य मिळवून दिलें. विद्वत्ता व विरक्ती यांचें मूर्तिमंत प्रतीक असलेले श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ (१८ वे स्वामी), यांच्या कारकीर्दींत मठाच्या पताका अधिकच उंचावल्या आणि विद्वानांपासून सामान्य लोकांच्या

मनांत देखील सन्मानाचे स्थान त्यांनी मिळविलें.

## आधुनिक कालखंडांतील आचार्य

नंतरचा काळ हा सर्व प्रकारें वादळी काळ म्हणावा लागेल. गोव्यांत पोर्तुगीज सत्ता स्थिर झाली होती. जुन्याचा लोप होत जाऊन त्याची जागा नव्याने बळकवण्याचा तो काळ होता.

पर्तगाळी स्वामीपरंपरेतील अठरावे स्वामी श्रीपूर्णप्रज्ञतीर्थ हे मूळचे मुडगेरी गांवचे. श्रीआनंदतीर्थ समाधिस्त झाल्यावर त्यांना पट्टाभिषेक करण्यांत आला. त्यांची कारकीर्द जवळ जवळ पन्नास वर्षांची झाली. त्यांनी मध्वाचार्यांच्या ब्रह्मसूत्राचा चांगला अभ्यास केला होता. इतकेच नव्हे तर आतापर्यंतच्या इतर ग्रंथाचाहि त्यांचा व्यासंग जबरदस्त होता. विद्वान् व विरक्त म्हणून ते प्रसिद्ध आहेत. परंतु या अध्यात्मज्ञानाने ते स्वयंकेंद्रित मात्र बनले नाहींत. आपल्या ज्ञानाचा समाजालाहि उपयोग व्हावा यासाठीं त्यांनीं आपला पुष्कळ काळ विद्यादानांत घालविला. सार्वजनिक हिताचीं कामेंही त्यांनी केलीं. पैंगीण येथील गालजीबाग नदीवरील आणि माशें येथील निराकार देवळाच्या मागील खाडीवरील पूल त्यांनीच बांधविले. तीर्थयात्रेसाठी त्यांनी संपूर्ण भारतभर भ्रमण केले होते. त्यांची विद्वत्ता व अनासक्ति पाहून काशी येथील विद्वानांनीहि त्यांना मानपत्रें अर्पण केली होती. आपल्या पन्नास वर्षांच्या दीर्घ कालावधींत त्यांनी आपले शिष्य श्रीपद्मनाभतीर्थांच्या मदतीने मठाचा कारभार आणि आर्थिक स्थिति सुधारण्यासाठी खूपच प्रयत्न केले.

श्रीपूर्णप्रज्ञतीर्थांनी शके १७६१ सालीं गोकर्ण मठांत शिष्य-स्वीकार केला. हे १९व्या परंपरेतील आचार्य म्हणजे श्रीपद्मनाभतीर्थ. पद्मनाभतीर्थही गुरुंप्रमाणेंच दीर्घायुषी ठरले. ही जोडी एकमेकांना अगदी पूरक होती. गुरु तीर्थयात्रेसाठी गेल्यावेळी श्रीं पद्मनाभतीर्थ पर्तगाळी मठाचा सर्व कारभार चांगला ठेवीत. गुरुप्रमाणेंच त्यांचाहि न्याय, तर्क, व्याकरण आदि विषयांचा व्यासंग जबरदस्त होता. गुरुंप्रमाणेंच त्यांनीं पुष्कळ तीर्थयात्रा केल्या. त्यांनीहि संस्थानासाठीं पुष्कळ जमिनी मिळवल्या आणि संस्थानचा आर्थिक पाया भक्कम बनविण्यास हातभार लावला.

श्रीपद्मनाभतीर्थांचे शिष्य श्रीइंदिराकांत यांचा काळ म्हणजे गोकर्ण पर्तगाळी मठाच्या कारकीर्दीतील सुवर्णकाळच म्हणावा लागेल. लहानपणापासूनच एक असामान्य विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याति होती. भटकळ येथील पुराणिक या नेमिष्ठ आणि विद्वान् घराण्यांत त्यांचा जन्म झाला. दिसायलाहि ते अत्यंत तेजस्वी होते. त्यांचे व्यक्तित्व राजबिंडे होते. त्यांच्या व्यक्तित्वाचे वर्णन करणें ही लेखणीच्या शक्तीच्या

पलीकडील गोष्ट आहे. ज्यांना त्यांचे दर्शन घडले ते धन्य होत.

वयाच्या १५ व्या वर्षीं त्यांना आश्रमदीक्षा देण्यांत आली. आश्रमदीक्षा दिल्यानंतर पद्मनाभतीर्थांनीं इंदिराकांतजींच्या अभ्यासाची सोय केली. विद्वान् पंडिताची या कामी नियुक्ती केली होती. स्वतः गुरु स्वामीहि त्यांना पाठ देत होते. मुळांत माती चांगली होती. गुरुंनी त्याना फक्त आकार द्यायचे काम करायवयाचे होते. वेद, वेदांगे, काव्य, व्याकरण, साहित्य. न्यायमीमांसा आणि प्रत्येक ज्ञानशाखेचे त्यांनी सखोल ज्ञान घेतलें. गीता व ब्रह्मसूत्रें यांचा त्यानी विशेष अभ्यास केला. मूळांत तीव्र बुद्धि, अभ्यासाची आवड आणि तासन् तास श्रम करण्याची तयारी या गुणांमुळें इंदिराकांततीर्थांची गणना विद्वान् पंडितांत होऊं लागली. कुठल्याहि विषयावर ते इतक्या अधिकारवाणीने बोलत कीं त्यांची विद्वत्ता पाहून देवगुरु बृहस्पतीनेंहि त्यांची पाठ थोपटावी. प्रवचन करण्यांत तर त्यांचा हातखंडा होता. श्री इंदिराकांतजींनी अधिक कीर्ती मिळविली ती प्रवचनांच्याच जोरावर. त्यांचा हा गुण त्यांचे गुरु श्रीपद्मनाभतीर्थ यांच्याहि लक्षांत आला होता. त्यांनाहि शिष्य स्वामींबद्दल अभिमान वाटत होता.

इंदिराकांत स्वतः कर्मठ आचार विचारांचे होते. पण बंदलत्या काळाची गरज त्यांनी ओळखली होती. तरीसुद्धां शिष्यवर्गाने आपला धर्म तळमळीने आचरावा असें त्यांना वाटत होतें. त्यासाठीं त्यांनी पंचवीसदां संचार केला. सबंध भारतयात्रा केली. हिमालयांतील पुण्य स्थानांचेहि त्यांनी दर्शन घेतलें. शके १८१४ या वर्षीं पीठाधिष्ठित झाल्यानंतर चार वर्षांनी त्यांनी नरहरी तीर्थ हा शिष्य निवडला. आणि त्याला आश्रमदीक्षा दिली. नरहरीतीर्थ हेहि गुरुप्रमाणेंच बुद्धिमान् होते. स्वतः गुरुस्वामींनी शिष्यस्वामींच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष पुरविले होते. दीड वर्ष सुमारे असे गेले आणि नंतर अल्पकालीन आजार होऊन नरहरीतीर्थ समाधिस्त झाले. शिष्यपरिवारांत मतभेदहि ह्या काळांत पुष्कळसे उद्भवले, इंदिराकांतजींना कांही वेळां मनःस्तापहि सोसावा लागला. परंतु बुद्धीचा वापर करून त्यांनी सर्व प्रश्न सोडवले. काशी मठ आणि गोकर्ण मठ या दोन्ही मठांत त्यांनी सख्य घडवून आणलें.

इंदिराकांत स्वामी म्हणजे ध्येयवादाचा एक मूर्तिमंत पुतळा. न्यायमीमांसा या रुक्ष विषयांत रस घेणाऱ्या या स्वामींना मुले हीं देवाइतकींच आवडत. मुलेंही त्यांच्या भोंवती घोटाळत असत. स्वामीजी खडीसाखर, मनुका अशा खाण्याच्या वस्तू हाताशी ठेवीत. एखादें मूल दिसलें ती त्यास जवळ बोलवून त्याची विचारपूस करीत आणि त्याच्या हातावर खाऊ ठेवीत. त्यामुळें मुलांनाहि 'व्हडले स्वामी' (गुरुस्वामी) फारच आवडत. मोठ्या कार्यांत गुंतणारे हे महात्मे मुलांबरोबर छोट्यांहूनहि छोटे होत.

वन्य प्राण्यांवरहि इंदिराकांतांचें फारच प्रेम होतें. त्यांनी एक लहानसे पशुपक्षी संग्रहालयही निर्माण केलें होतें. ते स्वतः त्यांना खाऊं घालीत. त्यांचा परिचित पदरव ऐकतांच ते मुके प्राणीहि त्यांच्याजवळ येत. गोठ्यांत गोधनहि त्यांनी भरपूर बाळगलें होतें. मुक्या प्राण्यांवरहि प्रेम करणारे हे बहुधा पहिलेच आचार्य होत. विद्वान्, बुद्धिमान्, तपस्वी, प्रेमळ या गुणांबरोबरच लेखनाचीहि त्यांना आवड होती. चारशे पृष्ठांएवढा गीतेवरील भाष्याचा ग्रंथ त्यांनी लिहिला. त्यांचे प्रशिष्य श्रीद्वारकानाथतीर्थ यांनी पन्नास वर्षांनंतर त्याच्या या ग्रंथाची तिसरी आवृत्ति प्रसिद्ध केली. गीता भाष्याशिवाय 'गीतागौरव', 'न्यायमीमांसा', 'द्वैतबोधिनी' असेहि ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. सागरामाचार्य श्रीमत् सुनीती भागवतावर त्यांनी टीकाहि लिहिली आहे. एवढी ग्रंथसंपत्ति निर्माण करणारे आचार्य श्रीगोकर्ण पर्तगाळी मठाच्या परंपरेंतील हे पहिलेच होत. शके १८६४ चैत्र वद्य सप्तमी हा त्यांच्या अवतार समाप्तीचा दिन. या दिवशी रात्रौ बाराच्या सुमारास ते समाधिस्त झाले. शिष्यपरिवारास दुःखसागरांत लोटून ते अनंतांत विलिन झाले.

इंदिराकांत समाधिस्त झाल्यानंतर त्यांचे शिष्य श्रीकमलनाथ पीठाधिष्ठित झाले. आपले गुरु श्रीइंदिराकांत यांच्या इतके नसले तरी तेही एक विद्वान् पंडित होते. व्यवहारांतही ते निपुण होते. इंदिराकांतांचा बहुतेक काळ संचार आणि तीर्थयात्रा यांतच गेला. मठाचा कारभार स्वतः श्रीकमलनाथ यांनीच पाहिला. सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार कुशलतेने हाताळून त्यांनी मठाचा आर्थिक पाया भरभक्कम केला. मठासाठीं सुमारे शंभरावर ठिकाणें त्यांनीं मिळविली. त्यांची गुरुभक्तीहि अतुलनीय होती. इंदिराकांतांचा सर्व कारभार जरी त्यांच्याच हातीं सोपविला होता तरी कुठलीहि गोष्ट करतांना ते गुरुंचा सल्ला घेत. कारवारच्या मुरलीधर मठाची स्थापना आणि गोकर्ण व व्यंकटपुर मठाचा जीर्णोद्धारहि त्यांनीच केला.

पीठाधीश म्हणून त्यांची कारकीर्द अगदीं अल्पच- अवघी ११ महिने वीस दिवस इतकीच ठरली. इंदिराकांत शके १८६४ चैत्र वद्य ७ मीस समाधिस्त झाले अणि त्यांचे शिष्य गुरुभक्तपरायण श्रीकमलनाथ यांनी शके १८६५ ह्या वर्षी चैत्र शुक्ल एकादशीस समाधी घेतली. त्यापूर्वीं त्यांनीं शिष्यस्वीकार केला. इंदिराकांतांनीच नियुक्त केलेल्या बटूला त्यांनी आश्रम दिला. तेच श्रीमद् द्वारकानाथतीर्थ स्वामी.

श्री मठाचे २२ वे स्वामी श्रीमद् द्वारकानाथतीर्थ यांचा पट्टाभिषेक शके १८६५ मध्ये झाला व जवळजवळ तीस वर्षे त्यांनी आपली गौरवशाली कारकीर्द समर्थपणे चालविली. या कालावधींत मठाचा कारभार अधिक योजनाबद्ध, सुव्यवस्थित करण्यासाठी त्यांनी उपाय योजले. पण तसे करताना अखंड परंपरा व मठाचे मांगल्या यांना

कोणत्याच प्रकारे बाधा पोचणार नाही याची दक्षता घेतली आणि मठाच्या गौरवात मोलाची भर घातली. त्यांचे प्रसन्न व्यक्तिमत्व विद्यमान पिढीला सुपरिचित आहे. आसेतुहिमाचल भारतवर्षांचा संचार करून त्यांनी शिष्यवर्गाला वेळोवेळी मार्गदर्शन केलें व अनेक जीर्णोद्धाराचीं कामेही हातीं घेतलीं. त्यांचे आशीर्वाद मिळविण्याचे भाग्य आम्हा सर्वानाच लाभलेले आहे. त्यांची विद्वत्ता, बुद्धिमत्ता, शांत प्रेमळ वृत्ति, दानशूरता आदीचा आपण सर्वांनीं प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे. मुंबई येथील द्वारकानाथ भवन व श्रीराममंदिर हीं त्यांच्या गौरवशाली कारकीर्दीचीं स्मारकें म्हणतां येईल. दक्षिणेकडे संचारार्थ गेले असतांना श्रीमद् द्वारकानाथ स्वामीजींचे दि. १५ मार्च १९७३ रोजी (फाल्गुन वद्य ६ष्टी शके १८९५) अंकोला येथील मठांत महानिर्वाण झाल्यावर पर्तगाळ येथे इतर पीठाधीशांच्या वृन्दावनालगत त्यांचे वृन्दावन उभारण्यांत आलें.

## पर्तगाळ येथील मठवास्तु

परशुराम भूमि गोमंतकांत काणकोण तालुक्यांतील कुशावती नदीचा प्रवाह जेथें ईशान्य दिशेला वळसा घेतो त्या किनाऱ्यावर उभारण्यांत आलेली श्री गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाची वास्तु हें मठाचें मुख्यालय असलें तरी वारणासी येथें पवित्र गंगा नदीच्या किनारीं पंचगंगा घाटावर मठाचे संस्थापक परमपूज्य श्रीमन् नारायणतीर्थ स्वामीजींनी शालिवाहन शके १३९७ मन्मथ नाम संवत्सरांत उभारलेली मठवास्तु ही मठ परंपरेतील पहिली मठवास्तु होय. सबंध काशी क्षेत्रांत केवळ पंचगंगा घाटावर पांच नद्यांचा संगम झालेला आहे. म्हणूनच या घाटाला पंचगंगा घाट असें म्हणतात. हिमालयांत गोमुख व गंगोत्री येथून आपल्या सागर संगमाच्या दिशेने निघालेल्या गंगेच्या यात्रेंतील वारणासी येथील पंचगंगा मीलन हें पवित्रतम तीर्थ मानलें जातें. प्रयाग येथें गंगा, यमुना, सरस्वती या तीन नद्यांचा संगम होत असतो. पण पंचगंगा घाटावर (काशींत) किरणा व धूतपापा या दोन्ही नद्या भूगर्भांतील स्रोताच्या रूपाने आपलें तीर्थ गंगार्पण करीत असतात. शांत वेळी पंचगंगा घाटावर विशिष्ट ठिकाणीं गंगेंत प्रवेश केला तर भूगर्भांतील हे प्रवाह आपल्या स्पर्शाने संवेदना जागृत करीत असतात. हें संगमतीर्थ गोकर्ण मठाच्या बाजूला घाटाच्या पायऱ्या संपतात तेथें असल्यानें वारणासी मठाचे महत्त्व अधिकच वाढलें आहे. या मठाच्या स्थापनेची कथाहि अद्‌भुत आहे. केवळ दैवी योगायोगानेंच श्रीनारायणतीर्थ यांच्या हातून तो मठ बांधला गेला आणि आजहि त्या पवित्रमय ठिकाणावरून तो मठ संप्रदायाच्या विविध शाखा-विस्तारांना प्रेरणारूप ठरला आहे.

परंपरेतील दुसरे स्वामी श्रीवासुदेवतीर्थ हे गुरुपीठावर अल्पकाळ राहिले. त्यांनी आंखलेल्या अनेक योजना ते कार्यवाहींत आणूं शकले नाहींत. परंतु त्यांचे शिष्योत्तम श्रीजीवोत्तमतीर्थ यांनी आपल्या सत्तर वर्षांच्या कारकिर्दीत अभूतपूर्व अशा सिद्धि मिळविल्या आणि मठाच्या पताका उत्तुंग फडकावून सर्वांच्या कौतुकास व आंदरास ते पात्र ठरले. श्रीजीवोत्तमतीर्थ हे प्रकांड पंडित तर होतेच, त्याशिवाय कठोर-आध्यात्मिक साधनेद्वारे आणि देशाटने व तीर्थाटने करून त्यानी आपली वैयक्तिक योग्यता वाढविली होती. आपले मूळगांव बसरूर येथे एक मठवास्तु उभी केली व श्रीगोकर्ण क्षेत्राचें महत्त्व ओळखून त्या ठिकाणींहि मठ उभा केला.

श्रीजीवोत्तमतीर्थ यांचे प्रिय शिष्य श्रीपुरुषोत्तमतीर्थ (४) यांच्या वांट्यालाहि अल्पकाळ गुरुपद आलें. गुरुवर्य वृंदावनस्थ झाल्यानंतर त्याच संवत्सरांत त्यांनी आपली इहलोकाची यात्रा संपविली व मठाचीं सूत्रे शिष्य श्रीअणुजीवोत्तमतीर्थ यांजकडे सुपूर्द केलीं. श्रीअणुजीवोत्तमतीर्थ हे एकूण पन्नास वर्षें पीठावर राहिले. परंतु त्यांनी डिचोली येथें केवळ एकच मठवास्तु उभारली. मठ-परंपरेतील ती पांचवी मठवास्तु होय.

पर्तगाळी येथें मठ बांधायचे महाकार्य सहावे यतिवर्य, युगप्रवर्तक श्रीरामचंद्रतीर्थ यांनी केलें (शके १५६९ ते १५८७).

पर्तगाळी मठाबद्दल एक आख्यायिका आहे ती येथें नमूद करणे अप्रस्तुत ठरू नये. श्रीरामचंद्रतीर्थ यांचा मुक्काम गोकर्ण क्षेत्रीं कोटितीर्थावर आसताना वारणासी येथील ईशान्यप्लवा गंगेवर बांधलेली मठवास्तु हातांतून निसटणार तर नाहीं ना अशी परिस्थिती निर्माण झाली. ज्या अर्चकाच्या स्वाधीन मठवास्तु सुपूर्द करताना नित्य-पूजाअर्चेची जबाबदारी सोपविण्यांत आली होती, त्या अर्चकाच्या वंशजांना ती वास्तू आपली खाजगी मालमत्ता बनविण्याचा मोह झाला. त्या काळीं सारे कागदपत्र अर्चकाच्याच नांवें रहात.

मुळांत वारणासी अत्यंत सुदूर, आणि त्या काळांत आजच्यासारखीं संपर्काचीं वा प्रवासाचीं साधनेंहि नव्हतीं. विशेष म्हणजे काशी क्षेत्रावर यवनी राजवटीचें सावट पसरलें होतें. मठवास्तूची नोंदणी आपल्या पूर्वजांच्या नांवावर आहे, एवढ्या लेखी पुराव्याच्या आधारें मठाची मालकी रद्द करण्याचा त्याने घाट घातला. श्रीरामचंद्रतीर्थांना कुणा मठाभिमानी व्यक्तीकडून घडल्या प्रकाराचा संदेश मिळाला. श्रीस्वामीजींनी तत्काळ कायदेशीर उपाय योजून मठाचा ताबा पूर्ववत् श्रीसंस्थानाकडे यावा म्हणून खटाटोप सुरू केला. पण इतक्या लांबून काशीतील मठावर ताबा ठेवतां येणार नाहीं आणि ईशान्यप्लवा गंगेच्या कांठावर असलेली आपली मठवास्तू गमावून

बसावी लागेल या चिंतेंत असतांना अनपेक्षितरीत्या त्यांना दृष्टांत झाला.

स्वामीजींना असा संकेत मिळाला कीं मठाच्या मागच्या बाजूला भूगर्भात स्वयंभू चार प्रतिमा आहेत. स्वामीजींनी तो श्रीरामचंद्राचा आदेश मानून उत्खनन केले आणि बरेच पाषाण भेदल्यानंतर तेथे श्रीराम, सीता, लक्ष्मण व मारुती अशा चार मूर्ति सांपडल्या. ह्या मूर्ति मठांत आणून त्यांची प्रतिष्ठापना करण्याचा स्वामीजींचा मनोदय होता. परंतु त्याच रात्री पुन्हा असा दृष्टांत झाला की, ह्या मूर्ति घेऊन स्वामीजींनी भारताच्या पश्चिम किनाऱ्याने उत्तर दिशेकडे जावे आणि मूर्तिवाहकाना त्या भारी वाटूं लागतील अशा ठिकाणी मुक्काम करून पुढील आदेशाची प्रतीक्षा करावी. त्या आदेशानुसार दुसऱ्या दिवशी पहाटे स्वामीजी, मूर्तिवाहक व इतर शिष्यपरिवाराच्या समवेत उत्तरेच्या दिशेने संचारास निघाले. सूर्यास्ताच्या सुमारास स्वामीजी आपल्या परिवारासह गोव्यातील पैंगीण गांवीं पोहोचले असतां थकलेल्या वाहकांनी मूर्तीच्या टोपल्या खाली ठेवल्या.

स्वामीजींना एक नयनरम्य प्रशांत असे स्थळ तर हवे होतें. ज्या ठिकाणीं गुरांचा संचार असतो ते स्थान हिंस्र जनावरांपासून मुक्त असतें हें ते जाणून होते. त्यामुळें गायींच्या मागोमाग परिसराचा वेध घेत मार्गक्रमण करण्याचे त्यानी ठरविलें. एखादी स्वच्छ निर्मळ गंगा ज्या ठिकाणीं उत्तरवाहिनी अथवा ईशान्यप्लवा होईल अशा ठिकाणीं मठवास्तु उभारली तर पुढें मागे वारणासी येथील मठ हातून गेला तरी त्याची भरपाई होईल असा विचार त्यांच्या मनांत प्रबळ झाला होता. धेनूच्या रूपाने श्रीहरीचा दूत मार्गदर्शन करीत असेल तर हा सारा परिसर व्यापून टाकण्याची महत्त्वाकांक्षाहि मनांत आकार घेऊ लागली.

पहाटे स्वामीजींना स्वप्नांत पुन्हा दृष्टांत झाला. या खेपेला असा आदेश मिळाला की स्वामीजी परशुराम भूमींत दाखल झालेले असून उद्या परशुरामाची धेनु स्वतः येऊन स्वामीजींना पुढील मार्ग दाखवील. आणि खरोखरच तसेच घडले. सूर्योदयाबरोबरच श्रींच्या मुक्कामाच्या दारांत एक गाय येऊन दाखल झाली. स्वामीजींनी धेनूचे पूजन वगैरे केल्यावर गाय चालूं लागली. तिच्या मागोमाग स्वामीजींचा परिवार चालत होता. उत्तरेच्या दिशेने डोंगर-जंगले तुडवीत गाय कुशावती नदीच्या तीरावर येऊन थांबली व तेथे एके ठिकाणी तिने दुधाची धार सोडली. त्या ठिकाणी श्रीराम, सीता व लक्ष्मण ह्या तीन मूर्तीची प्रतिष्ठापना करून सध्याचा पर्तगाळी मठ स्थापन करण्यात आला. नंतर गाय पुन्हा चालूं लागली व तिने थेट रिवण येथे जाऊन दुसऱ्यांदा दुधाची धार सोडली. तेथेही एक मठ उभारून मारुतीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.

या मौखिक इतिहासाप्रमाणेच पर्तगाळी क्षेत्राकडे दुसऱ्या दृष्टिकोनांतून पाहून मठवास्तूच्या स्थानाच्या निवडी मागें धर्मशास्त्रास अनुसरून असा निष्कर्ष काढण्यांत येतो कीं पर्तगाळी मठवास्तु जेथे उभी आहे नेमक्या त्या ठिकाणीं कुशावती नदी ईशान्यप्लवा बनलेली आहे. धर्मशास्त्र तंत्र-आगम शास्त्रामध्ये ईशान्यप्लवा नदीचें स्थान ही देवभूमि मानली जाते. स्थानाचें महत्त्व व महात्म्य केवळ नदीवर अवलंबून ठेवण्यांत आलेलें नाही. पावसाळ्यांत चारहि बाजूचें पाणी ज्या ठिकाणीं एकत्र येतें आणि संचित पाण्याला नैसर्गिकरीत्या जो प्रवाह फुटतो तो ईशान्य दिशेने वाहत असेल तर तें हि उत्तम निवेशन संबोधण्यांत आलें आहे. पूर्वेकडे अथवा ईशान्येकडे प्रवाहित होणारा जलप्रवाह असेल तर तें स्थान देवमंदिरासाठीं अनुरूप मानलें जातें.

ऐतिहासिक कागदपत्रांच्या नोंदीवरून मठ परंपरेचे तिसरे स्वामीजी परमपूज्य श्री जीवोत्तमतीर्थ यांनी पैंगीण गांवाला भेट देऊन श्रीपरशुराम दर्शन घेतल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. तत्पूर्वीं त्यानी ब्रह्मस्थानांतील प्राचीन विशाल वटवृक्षाचें दर्शन घेतलें आणि कुशावतीच्या ईशान्यप्लवा प्रवाहांत पांद-मुख प्रक्षालन केलें. आज देखील पर्तगाळ मठवास्तूच्या पाठीमागे पूर्वेकडून वहात आलेला कुशावतीचा तीर्थप्रवाह पर्तगाळी येथें पोंचताच एकाएकीं ईशान्य दिशेला वळतो आणि अर्दफोंड-तळपण मार्गे सागरांत आत्मविलोपन करतो.

श्रीरामचंद्रतीर्थ सकाळीं उठून पुढच्या प्रयाणाला दिशा लावीत असतांना त्यांच्या समोरून जात असलेल्या गुरांच्या कळपाचा मागोवा घेत स्वामीजी पायीं चालत कुशावतीच्या तीरावर येऊन पोचले. त्या दिवसाची आराध्य दैवताची महापूजा वगैरे नदीतीरावरच केली. नदी तीरावर गुरांचे कळप विसावले होते. लहान लहान वासरें ही कळपांत होतीं. तीं गाईचें दूध पिऊन संतुष्ट मनाने बागडत होतीं. वासरें हुंदडताना पाहून स्वामीजींचें मन आनंदाने भरून आलें. देवमाता कामधेनू सारख्या गाईला आई मानून भारतीय लोक तिची पूजा करतात. श्रीमन्महाभारतामध्ये- "मातरः सर्वभूतानां गावः सर्वसुखप्रदाः"

सर्व प्राणीमात्रांना गाय ही माते समान असून सर्व तऱ्हेचें सुख देणारी आहे. गायीचें दूध, दही, लोणी व तूप ह्यांपैकी एखादा पदार्थ नसल्यास ते स्वादरहित भोजन असें गणलें जातें. 'विना गोरसं को रसो भोजनानाम्' गोरस नसल्यास भोजनाला रस कोणता? असें म्हणतात. गाईचें दूध मधुर, पथ्यकर, पुष्टीदायक असतें. गाईचें तूप हा देवांना आहार आहे असे मानले जातें.

मधुर मुलायम हरित गवत ही गुरांसाठीं निःसंकोच मनाने चरण्यास अनुकूल अशी जागा असते. आणि गुरांच्या उपस्थितीमुळें वातावरणांत निसर्गवीणेचे झंकार

निनादूं लागतात. हिंस्र प्राण्यापासून आपण दूर आहोंत याची जाणीव सर्वप्रथम गुरांना होते आणि निसर्ग निर्मित हिरव्या गालिच्यावर पहुडतांना तीं आनंद व्यक्त करण्यासाठीं हंबरूं लागतात. आजहि पर्तगाळी मठाच्या परिसरांत मठाच्या मालकीच्यां गुरांशिवाय आजूबाजूचीं गुरेंहि मोठ्या संख्येने कळप करून विसावलेली पहायला मिळतात.

अशा प्रसन्न वातावरणांत जेव्हां सहावे स्वामी श्रीरामचंद्रतीर्थ यांनी ईशान्यप्लवा कुशावतीचें दर्शन घेतलें तेव्हां अनुरूप जागेच्या शोधार्थ चालवलेली वणवण संपल्याचा दिलासा त्यांना मिळाला. आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन याची प्रचीति पुण्यवंत स्वामीना आली.

सकाळीं दुभतें काढल्यानंतर गुरे प्राचारार्थ (गवत शोधत) ह्या नदीकांठावर येत राहून आपल्या वासरांना दूध देत असलेलीं पाहून व ईशान्यप्लवा नदीचा प्रवाह लक्षांत घेऊन देवसन्निधी असलेलें एक देवालय उभारण्यासाठीं ही भूमि प्रशस्त आहे असें त्यांनी विचारान्तीं ठरविलें आणि रामदेवाची प्रतिष्ठापना १६५६ सालीं केली.

गोमंतक ही परशुराम भूमि म्हणून ओळखली जाते. भगवान् परशुरामाने गोमंतकाच्या पूर्व दिशेला असलेल्या सह्य पर्वतावरून अरबी समुद्रांत बाण मारून जी नवी भूमि बनविली, तीच ही गोमंतकभूमि. सारस्वत प्रदेशांतून ब्राह्मणकुळें आणवून त्याने गोमंतकांत यज्ञ केला आणि तो गोमंतकांतच राहिला अशी आख्यायिका आहे. परशुरामाचे देऊळ गोमंतक प्रदेशांतील काणकोण तालुक्यांतील पैंगीण गांवी आहे. हा गांवही पर्तगाळ गांवाहून जवळच आहे. या परशुराम भूमीत मठस्थापना करून श्री रामचंद्रतीर्थांनी वैष्णव धर्माची पताका आणखी उंचावली. हा घटना सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखी आहे. या घटनेपासूनच श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या दैदीप्यमान कारकीर्दीस आरंभ झाला आणि तेव्हांपासून पर्तगाळ हेंच या मठाचे मुख्य केंद्र बनले.

या पुरातन मठवास्तूचा जीर्णोध्दार यापूर्वी श्रीशके १६२५ मध्ये श्रीलक्ष्मीकांततीर्थ स्वामीजींच्या कारकिर्दीत व दुसऱ्यांदा श्रीशके १७३१ शुक्ल संवत्सरांत श्रीमठपरंपरेतील सतरावे मठाधीश श्रीआनंदतीर्थ स्वामीजीनी केल्यानंतर मठवास्तू अजून जीर्ण झालेली नसली तरी बदलत्या काळानुरूप या समग्र क्षेत्राचा विकास व विस्तार होणे आवश्यक होते. पंतशताब्दि महोत्सव प्रसंगी (श्रीशके १८९९ ) पर्तगाळी मठ हें अध्यात्म व संस्कृतीचे प्रमुख केंद्र बनविण्याच्या दृष्टीने एक बृहद्योजना आखण्यात आली.

पहिल्या टप्प्यात दर्शनी भागांत एक भव्य वास्तु उभारून अग्रभागी दोन दालने व एक महाद्वार बांधण्यात आले आहे. डावीकडील दालनात कार्यालये, दुर्मिळ व पुरातन हस्तलिखिते व वास्तु यांचे संग्रहालय, निवडक धर्मग्रंथ व पोथ्यांचे ग्रंथालय, संशोधन कार्यासाठी एक अध्ययनकक्ष. उजवीकडील दालनांत श्रीजीवोत्तम संस्कृत पाठशाळा, विद्यार्थ्यांचे ग्रंथालय व विद्यार्थ्यांच्या निवासासाठी सर्व सोयींनी परिपूर्ण असे शयनकक्ष आहेत. तळमजला व पहिला मजला असलेल्या या दुमजली वास्तूच्या मध्यभागी मठवास्तूंत प्रवेश करण्यासाठीं असलेले महाद्वार श्रीराममंदिरासमोर आहे. महाद्वारापासून जुन्या मठवास्तू दरम्यान दुतर्फा असलेल्या मोकळ्या जागेत एक विशाल सभागार बांधण्यात येणार असून त्याच ठिकाणी चावडी व सिंहासनाचीही व्यवस्था राहील.

पंचशताब्दि महोत्सवाच्या निमित्ताने पर्तगाळ मठवास्तूच्या संपूर्ण जिर्णोद्धार व विस्ताराचे किंबहुना कायाकल्पाचें एक भव्य स्वप्न श्रीविद्याधिराजतीर्थांनी पाहिलें आणि त्या स्वप्नाला योजनाबध्द आकार देऊन तीन टप्प्यांत या जीर्णोध्दाराचें कार्य पूर्ण केलें.

अशा रीतीने पूर्णत्वाला नेलेल्या जीर्णोध्दारित मठवास्तूचे कार्य पूर्ण होऊन त्याचे रीतसर उद्‌घाटन चैत्र शु. २ या शके १९२१, म्हणजे दि. १९ मार्च १९९९ रोजीं श्रीविद्याधिराज तीर्थांच्या पवित्र हस्तें झालें व त्यांचें एक स्वप्न साकारलें. प्रभु रामचंद्राच्या गळ्यांत वास्तुरूपी माळा घालण्याची इच्छा पूर्ण झाली.

## रामनवमी उत्सव

पर्तगाळी मठांत श्रीराम-मूर्तीची स्थापना झाली आणि दरवर्षी रामनवमीचा उत्सव थाटांत होऊ लागला. ह्या उत्सवासाठी श्रीरामचंद्रतीर्थांनी एक मोठा रथ तयार करून घेतला होता. रामनवमीच्या रात्री या रथांतून राममूर्तीची मिरवणूक काढीत. हा उत्सव अपेक्षेबाहेर यशस्वी झाला. परिसरांतील भाविक श्रीरामनवमी उत्सवासाठीं पर्तगाळीला येऊं लागले.

रामनवमीचा उत्सव फक्त रामनवमी पुरताच न उरतां तो पंचमीपासून सुरू होऊ लागला. आणि गरुडपूजन, ध्वजारोहण, दंडबली, होम-हवन इत्यादि कार्यक्रमांचीही या उत्सवाला जोड मिळाली. कांही वर्षातच या उत्सवाची ख्याति आसपासच्या भागांत पसरली आणि दक्षिण कर्नाटकापर्यंतचा सारा शिष्यगण रामनवमी उत्सवासाठी पर्तगाळी मठांत जमूं लागला.

रामनवमीचा उत्सव पर्तगाळी मठांत मोठ्या प्रमाणावर साजरा होतो आणि

उत्तरोत्तर मठाची महति वाढते आहे हें पाहून सौंदे मठाधिपतींना त्यांचे वैषम्य वाटू लागले. तशांतच दोन्ही मठांत एका गांवाच्या वतनावरून वाद चालू होता आणि त्याचा निकाल पर्तगाळ मठाच्या बाजूने लागला होता. याविषयींहि वैषम्य वाटून एका वर्षाच्या रामनवमीच्या उत्सवाच्या दिवशी सौंदे मठाधिपतींनी मंत्रबळाने आपल्या अंकीत झालेल्या नारायण भूताला - एका पिशाच्च योनीतील सेवकाला - पर्तगाळी येथील उत्सवात अपशकून करण्यासाठी पाठवून दिले.

रामनवमीचा उत्सव रंगांत आला होता. उत्सवमूर्तीची महारथातून मिरवणूक निघाली होती. वाद्यनादांत, मंत्रघोषांत आणि 'पुंडलिक वरदे हरि विठ्ठल'च्या गजरांत भक्तगण रथ ओढीत होते. उत्साहांत रथ डोलत डोलत मुख्यप्राणाच्या घुडाकडे चालला होता. अकस्मात काय घडलें कुणालाच कळलें नाहीं. रथ चालायचा बंद झाला. 'ओढा, ओढा' च्या गजरांत लोक रथ ओढीत होते. रथाच्या सहाही दोरांना धरून भक्तगण शक्तीची शिकस्त करीत होते, पण रथ मुळीं हलायलाच तयार नव्हता. उत्सवाला जमलेल्यांनी खाली मठांत जाऊन ताबडतोब ही वार्ता स्वामीजींच्या कानावर घातली. दिग्विजय रामचंद्रतीर्थ उत्सवाच्या पुढील कार्यक्रमाची रूपरेषा आंखण्यात गढून गेले होते, आणि इतक्यांत रथ थांबून राहिल्याची कटु वार्ता त्यांच्या कानावर पडली. क्षणभर मन अंतर्मुख करून पाहिले आणि सारा प्रकार त्यांच्या लक्षांत आला. ताबडतोब ते उठले आणि तिथेंच ठेवलेला एक नारळ घेऊन ते रथबिदिकडे आले. रथाजवळ येऊन योगबळाने त्यांनी नारायण भूतास आपल्या जवळच्या नारळांत विलीन होण्यास भाग पाडले आणि तो नारळ त्यांनी मुख्य प्राणाच्या (मारुतीच्या) घुडाच्या पायाजवळ स्तंभित केला.

तेव्हांपासून महारथ मुख्य प्राणाच्या घुडाजवळ पोहोचतांच तेलांत भिजलेलीं दोन लांबलांब वस्त्रें घुडावरून खाली सोडून जाळलीं जातात. शिवाय भूतराजास नारळांचा नैवेद्यहि अर्पण केला जातो. इतर उत्सवाच्या वेळी पालखी घुडाजवळ आली की मुख्यप्राणास आणि भूतराजास नारळाचा नैवेद्य दाखविला जातो. अर्थात ही आख्यायिका आहे. एवढे खरे की आजहि मारुती घुडाच्या पायाजवळ नारायण भुताची प्रतिमा आहे तिचे स्मरण रामनवमीच्या दिवशीं आवर्जून केलें जातें.

## श्री शतकोटी रामनाम महायज्ञ

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या सपाद पंचशताब्दी महोत्सवाची योजना आखताना सर्वप्रथम प.पू. श्रीमद् विद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी प्रभु रामचंद्राचे स्मरण केले व असा आदेश दिला की पर्तगाळ मठ श्रीरामदेवालयाच्या कक्षेंत व

आधिपत्याखाली कार्यरत असल्यामुळे या मठाबाबत कोणताही विचार करताना सर्वप्रथम श्रीरामाचे स्मरण, स्तवन, भजन करणे इश्ट होईल. श्रीमठाने इतिहासांतील कसोटीच्या प्रसंगी जे महनीय कार्य केले ते श्रीरामचंद्राच्या कृपाशिर्वादानेच होय. आज श्रीमठाच्या सेवाकार्याचीं पांचशे पंचवीस वर्षे पूर्ण होत असताना मठानुयायी वर्ग केवळ नव्हे, समस्त सारस्वत समाजाला सहभागी करून श्रीरामनामाचा शतकोटी जप महायज्ञ व्हावा, जेणेकरून समाजामध्ये नवी चेतना जागृत होऊन समाजिक एकता वृद्धिंगत होऊं शकेल. श्री स्वामीजींनी विषद केलेल्या महायज्ञाचे कांही विशेष आहेत. यज्ञाची समाप्ती मठसंस्थापनेच्या तिथिला म्हणजे ६ एप्रिल २००० रोजी श्रीपर्तगाळी मठाच्या प्रांगणांत व्हावयाची असली तरी समाजाने या यज्ञाचा आरंभ स्वतःच्या राहत्या घरांत समस्त कुटुंबियांसमवेत करावा आणि शालिवाहन शकाच्या शेवटच्या दिवशीं आपण केलेल्या नामजपाची नोंदणी महोत्सव समितीकडे सुपूर्द करावी.

दुसऱ्याही कांही मौल्यवान सूचना पूज्य श्रीस्वामीजींनी केल्या. त्यामध्ये तेरा अक्षरांचा सुलभ व सुबोध असा 'श्रीराम जय राम जय जय राम' या मंत्राचे सामुदायिकरीत्या प्रगट उच्चारण झालें पाहिजे. अशा उच्चारित जपामुळे जी आंदोलनें पसरतील त्यामुळे घरांतील वातावरण मांगल्याने व प्रेमाने भरलेले राहील. या जपामुळे कुटुंबांतील स्नेहसलोखा वृद्धिंगत होऊन देवभक्ती दृढ होऊन वातावरण शुद्ध बनू शकेल. समाजाकडून या जपमहायज्ञाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

श्री रामनामाचे महत्त्व व महात्म्य सर्वयुगात व सर्वकाळांत अतुलनीय राहिले आहे.

**यो रामं संस्मरेन्नित्यं भवत्यामनुपरायणः।**
**तस्याहमिष्ट संसिध्ये दीक्षितोस्मि मुनीश्वरः।।**

मुनीश्वरः - जो नित्य भक्ति-भावे जपतो, श्रीरामाचे ध्यान करितो त्याचे मनोरथ पूर्ण करण्यास मी सदा तत्पर असतों.

श्रीरामनामाची महिमा सर्वकाळांत त्या त्या कालखंडांतील आध्यात्मिक ज्ञानीश्रेष्ठानी, श्रद्धाळू भक्तवृन्दाकडून तसेच विवेकशील तर्कबुद्धिवंतानी गायिली आहे. आधुनिक युगांतही महात्मा गांधी सारख्या थोर विभूतीनी श्रीरामनामाचे स्मरण आणि अखंड चिंतनाचे महात्म्य प्रतिपादिताना श्रीरामनाम जपाने शारीरिक आणि मानसिक क्लेश दूर ठेवून मनःशांती लाभते आणि त्याची प्रेरणा सत्कार्य प्रवृत्त करते असेही प्रतिपादन केले आहे. नामानुभूतीची प्रथम महती वेदांमध्ये स्पष्ट आढळून येते. ऋग्वेदांत राम शब्दाची शेंकडो वेळां पुनरुक्ति झालेली पहायला मिळते. उपनिषद्

काळांत श्रीरामनाम हें समस्त वेदांचा सार आहे असें नमूद करण्यांत आलें आहे.

**सर्वे वेदा यत् पदं आमनंति**

समस्त वेद परमात्म्याचेच आमनन करीत आहेत. या साठी वेदाना आम्नाय अर्थात् देवांच्या नामाचे गुणगान करणारे अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. 'आमनन' अर्थात् विस्तृत मनन. तीच श्रद्धा असे संतानी समर्थन केले आहे.

वैष्णव भक्त श्रीसंत तुकाराम सांगतात :

**वेद अनंत बोलिला। अर्थ इतुकाची साधिला।**
**विठोबासी शरण जावे। निज निष्ठा नाम गावे।**

वेदांताचा सार एवढाच जाणावा की विठोबाला शरण जाऊन त्याचे नाम निष्ठेने भजावे.

महात्मा गांधीजीनी म्हटल्याप्रमाणे - श्रीरामनामाचा जप अंतःकरणपूर्वक करावा. केवळ पठण न करतां अंतर्मुखी बनण्यासाठी साधना घडावी.

'नाम' शब्द 'नमः' या धातूपासून उत्पन्न झाला आहे. त्या आधारे 'नम्र' आणि 'नमस्कार' हे शब्द उत्पन्न झाले. श्रीरामनाम हे भक्ताना असत्यापासून सत्याकडे, अंधःकारापासून प्रकाशाकडे, मृत्युपासून अमृतत्वाकडे नेणारे आहे.

वाल्या कोळ्याची कथा सर्वानाच विदित आहे.

वाटसरुंना अडवून लुबाडणे आणि प्रसंगानुसार त्यांची हत्या करणाऱ्या कोळ्याला नारदमुनीनी रामनामोपदेश करून त्याच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणलें आणि त्याचें क्रमशः महर्षि वाल्मिकींत रूपांतर झालें व 'रामायण' काव्याची रचना झाली.

केवळ तोंडाने रामनाम पठण केल्याने अपेक्षित फळ प्राप्त होत नसून त्याच्या उच्चारणांतील मर्म जाणून जप करावा. श्रीविष्णुसहस्रनामाचे प्रवक्ता भीष्मांची हीच अपेक्षा दिसून येते.

**"यानि नामानी गौणानि विख्यातानि महात्मनः"**

अर्थात् परमात्म्याची विश्वविख्यात सारीं नामें गौण आहेत. गौण म्हणजे गुणनिरुपण करणारीं. परमात्म्याचे प्रत्येक नांव त्याच्या प्रत्येक गुणाचे सूचक आहे. नामोच्चारणाच्या सोबत त्या गुणाचे साधकाकडून चिंतन घडावे व त्याचे आचरण करण्यांत दृढतापूर्वक प्रयत्नही व्हावे. संत कवि तुलसीदास सांगतात :

**"रामनाम मणी दीपधरू जीह देहली द्वार**
**तुलसी बाहर भीतरहु जो चाहसि उजियार"**

रामनामोच्चारणेचे विशेष महत्त्व आहे. त्याच्या निरंतर जपाने साधकाच्या कंठाद्वारे ते कधी काळी हृदयांत स्थिर झाल्यावांचून राहणार नाही.

संत तुकाराम म्हणतात :

**"नसे तरी मनीं नसो। परी वाचे तरी वसो"**

मनांत जरी नसलें तरी वाचेंत रामनाम असो.

पुराणे, स्तोत्रे व संतमहात्म्यांच्या वचनांमध्ये श्रीरामनाम जपाची महती व्यक्त झालेली आहे. 'रा' या एक अक्षराच्या जपाने उच्छ्वास होतो. तर 'म' या अक्षराच्या जपाने निःश्वास घडतो. ही क्रिया देह व मन यामधील संतुलन सांभाळून एकाग्रता प्रदान करते.

रामायणात सागरांत सेतु बांधण्याचा प्रसंग येऊन जातो. शिलेवर श्रीराम हीं अक्षरें कोरतांच मोठमोठ्या शिला पाण्यांत तरंगूं लागल्या असे वर्णन येऊन जातें. राम-जपा योगे मानवी जीवनांतील अवघड संकटे देखील हलकी होऊं लागतात.

श्रीरामनामात असे वेगळे आहे तरी काय, असा प्रश्न कांहीं लोक विचारतात. विशाल वटवृक्षाच्या ज्या लहानशा बीजांत महावृक्षाचें अस्तित्व सामावलेलें असतें त्याप्रमाणें परमात्म्याचें तत्त्व श्रीरामनामात सामावलेलें आहे.

## श्री रामनामाची महिमा

१. श्रीरामरक्षा :

**भर्जनं भवबीजानामर्जनं सुख संपदाम्।**<br>
**तर्जनं यमदूतानां राम रामेती गर्जनम्।।**

रामनामाचा गजर संसारिक दुःखाला बीजरूप असलेल्या वासनेला नष्ट करून सुख-संपत्ती बहाल करतो व यमदुताला धाक घालतो.

२. श्रीस्कन्द पुराण :

**रामेती द्वक्षर जपः सर्व पापापनोदकः।**<br>
**गच्छन् तिष्ठन् शयनो वा मनुजो रामकीर्तनात्।।**<br>
**इह निर्वर्तितो याति चांते हरिगणो भवेत्।**<br>
**रामेति द्वक्षरो मंत्रो मंत्र कोटि शताधिकः।।**

हार्दिक शुभेच्छा

**मेसर्स कामत इंजीनियरींग आणि ट्रेडर्स, मडगांव**

'राम' या द्वयाक्षराच्या जपाने सकल पापांचा नाश होतो. जो उठता, फिरता, शयनीं अर्थात् सर्वत्र रामनामाचे कीर्तन गातो तो कृतकृत्य होऊन हरिपद गांठतो. राम नाम हें शतकोटि मंत्राहूनहि अधिक प्रभावशाली आहे.

३. श्रीपद्म पुराण :

**न तत्पुराणं न हि यत्र रामो**
**यस्यां न रामो न च संहिता सा**
**स नेतिहासो न हि यत्र रामः**
**काव्यं न तत्स्यान्हहि यत्र रामः।।**

जेथें राम शब्द नाही ते पुराण पुराण नव्हे. राम शब्द नसलेली संहिता संहिता नव्हे. राम शब्द नसलेला इतिहास इतिहास नव्हे. राम शब्दाविण काव्य ते काव्य नव्हे.

४. अध्यात्म रामायणांत- भगवान् शिव उवाच :

**अहं भवन्नाम गृण्हन् कृतार्थो**
**वसामि काश्यामनिशं भवान्या**
**मुमूर्षमाणस्य विमुक्त येहं**
**दिशामि मंत्रं तव राम नाम।।**

- रामा, मी सदा तुझ्या नामस्मरणांत कृतार्थ होऊन पार्वतीसह काशीत वास करितों. मरणापर्यंत मुक्तिसाठी राममंत्राचा उपदेश त्याना करतों.

५. एके ठिकाणीं असे विदित केले आहे :

**अविकारि विकारी वा सर्व दोषैक भाजनः।**
**परमेश पदं याति रामनामानु कीर्तनात्।।**

मनुष्य निर्विकारी असो वा विकारी असो अथवा सर्वदोषाने युक्त असो, रामनामाच्या संकीर्तनाने तो परमात्म पदाला पोहोचतो.

६. श्रीपद्मपुराणांत शंकराने पार्वतीला सांगितले :

**रामरामेति रामेति रमे रामे मनोरमे।**
**सहस्र नाम तत्तुल्यं रामनाम वरानने।।**

श्रीविष्णु सहस्र नामाचे पठण करणें साध्य नसल्यास केवळ रामनामाच्या जपमात्राने सहस्र नाम पठणाचे फल प्राप्त होतें.

हार्दिक शुभेच्छा
जयवंत टायर्स, फोंडा गोवा

७. श्रीकलि संतरणोपनिषत् :

**य-द्दिव्यनाम स्मरतां संसारी गोष्पदायते।**
**स्वानन्य भक्तिर्भवति तद्राम पदमाश्रये।।**

ज्या दिव्य रामनामाच्या स्मरणमात्रें समस्त जग च गोपादा इतके लहान दिसू लागतें, वा जो या नामांत तल्लीन होऊन परमानन्दाच्या सुखांत रमतो, अशा रामनामाचा मी आश्रय घेतों.

८. श्रीरामनामाची महिमा खालील श्लोकांत गर्भित आहे

**बहवो हरिहर मंत्राहुः तत्रच पंचाष्टकौ श्रेष्ठौ।**
**तत्रापि च राम मंत्रः तदभावे नाथनाथ न शिवाय।।**

हरिहरांच्या अनेक मंत्रांपैकी 'ॐ नमो नारायणाय' हा अष्टाक्षरी आणि 'नमः शिवाय' हा पंचाक्षरी मंत्र अति श्रेष्ठ आहेत. या उभय मंत्रांत समाविष्ट 'राम' मंत्र अत्यंत श्रेष्ठ आहे. नारायण शब्दांत 'रा' आणि नमः शिवाय शब्दांत 'म' वगळल्यास त्याचा अर्थ क्रमशः 'पुण्य नाही' 'कल्याण नाही' असा होतो.

९. एका संस्कृत कीर्तनकाराने म्हटलें आहे :

**पिबरे राम रसं रसने जनन मरण भय शोक विदूरं।**
**सकल शास्त्र निगमागम सारं, शुद्ध परमहंसाश्रम गीतं।**
**शुक शौनक कौशिक मुख पीतं, सततं श्रीरामं चिंतय विमुक्तं।।**

हे रसना (जिव्हा) - तूं रामनामाचें अमृत निरंतर पी. जनन-मरणाच्या भय-शोकादिपासून दूर, सकल निगमागम शास्त्रांचे सार-स्वरूप शुद्ध परमहंसानी गायन केलेलें, शुक-शौनकादि मुनिवर्यांच्या मुखें प्राशन केलेल्या श्रीरामनामाचें नित्य भजन कर.

१०. भक्त श्रेष्ठ तुलसीदास सांगतात :

**राम जपु राम जपु राम जपु बावरे।**
**घोर भव नीरनिधि नाम निज नावरे।।**

घोर भवसागर तरण्यास नावे समान असलेल्या रामनामाचा तू निरंतर जप कर.

११. दुसऱ्या एके ठिकाणी ते म्हणतात :

**रामनाम मणी दीपधरू जीह देहली द्वार।**
**तुलसी बाहर भीतरहु जो चाहसि उजियार।।**

उंबरठ्यावरील ज्योतीचा प्रकाश आंत-बाहेर जसा पसरतो, तसे रसना रूपी देहाच्या उंबरठ्यावर रामनामाची ज्योत ठेवल्यास प्रकाश देहाच्या आंत-बाहेर पसरतो.

१२. संत कबीर :

**दशरथ सुत तिहु लोक बखाना।**
**राम नामका मरम है आना।।**

त्रिलोकांत रामाला दशरथ पुत्र जरी म्हटले गेले तरी रामनामाचे मर्म याहून वेगळे आहे. अर्थात् रामनाम परब्रह्माचे सूचक आहे.

१३. महात्मा चरणदासांच्या शब्दांत :

**राम राम राम राम गाओ। मनके रोग सकल बिसराओ।**
**राम प्रताप सिला जल तारी। सोई नाम जपो नरनारी।।**

मनाच्या समस्त विकारांना दूर लोटणारे, शिलेला पाण्यांत तरंगविणारे रामनाम सकल नरनारी जपो.

१४. समर्थ रामदास सांगतात :

**बहू नाम या राम नामी तुळेना।**
**अभाग्या नरा पामरा हे कळेना।।**
**विष औषध घेतले पार्वती शे।**
**जीवा मानवा किंकरा कोण पूसे।।**

रामनामाला समान दुसरा मंत्र नाही, पण अभाग्याला ते कळत नाही. विषप्राशन केलेल्या शंकरानेही रामनामाची औषधी घेऊन देहदाह शांत केला. असे असतां किंकर मानवाचे काय सांगू!

१५. संत तुकाराम :

**रामनामाचे पवाडे अखंड ज्याची वाचा पडे।**
**धन्य तो एक संसारी रामनाम जो उच्चारी।।**
**रामनाम गर्जे वाचा, काळ आशाधारक त्याचा।**
**तुका म्हणे राम नामी, कृतकृत्य झालो आमी।।**

रामनामाचे भजन अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. रामनामोच्चार करणारी व्यक्ति संसारी धन्य होय. उच्च स्वरांत जे भजन करतील त्यांचे सर्व दुरित नष्ट होऊन सकल मनोभीष्ट सिद्ध होतात. या रामनामाचे भजन करून तुकाराम कृतकृत्य झाले.

१६. शैवभक्त शिवदास :

**रामनाम वधो वाणि, मना जाली समाधानी।**
**म्हणत राम वेळो-वेळ, जळपती पाप अग्निज्वाळ।।**
**रामनामाचा प्रताप काय पुढें येईल पाप।**
**शिवदास म्हणे नाम। तान्हीं केले हेची काम।।**

रामनाम भजल्याने चित्त समाधान झाले. निरंतर केलेल्या जपाने पाप भस्म होऊन जाते. रामनामाचा प्रताप पापाला सामोरे येऊ देत नाही. शिवदासांनी रामनाम भजून हेची केले.

## श्री विद्याधिराजतीर्थांचें कार्य

श्रीविद्याधिराजतीर्थ १९७३ सालीं ज्या तिथीला श्रीगुरुपीठावर आले तो दिवस श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या संस्थापनेचा दिवस होता. पांच शतकें पूर्ण करण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या श्रीमठाच्या तोंवर बावीस पुण्यवंत स्वामीजींची अखंड परंपरा लाभली होती. श्रीविद्याधिराजतीर्थ हे परंपरेंतील तेविसावे स्वामी.

श्रीगुरुपीठावर येतांच त्यांनी श्रीमठसंस्थापनेचा पंचशताब्दि महोत्सव साजरा करण्याचा संकल्प जाहीर केला आणि एकदम युद्ध पातळीवर ते सर्वच क्षेत्रांमध्ये कार्यरत झाले. आपल्या कारकिर्दीचा शुभारंभ त्यांनी वारणासी क्षेत्रांतील श्रीसंस्थानच्या आद्य मठाच्या जीर्णोद्धाराद्वारें केला व त्यांच्या श्रीगुरुपीठारोहणाच्या रौप्यमहात्सवी वर्षांत (१९९८) त्यांनी दुर्लभ अशी शालिग्राम यात्रा करून वास्को (गोवा) येथें नूतन मठवास्तु बांधली.

१९ मार्च १९९९ (चैत्र शुक्ल द्वितीया, शके १९२१) रोजीं तीन टप्प्यांनी जीर्णोद्धार व विस्तार करण्यांत आलेल्या अतिभव्य अशा पर्तगाळ येथील मुख्य मठाच्या वास्तूचें विधिवत् उद्‌घाटन केलें. या सव्वीस वर्षांत श्रीस्वामीजींनी जेवढे कार्य केलें तेवढें यापूर्वींच्या पांचशें वर्षांत होऊ शकलें नव्हतें असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति ठरूं नये. पाव शतकाच्या कालावधीत श्रीस्वामीजींनी जे संकल्प केले व सारे पूर्णत्वास नेले. अशा कार्यामध्यें जुन्या मठवास्तूंचे जीर्णोद्धार व विस्तार, सारस्वत समाजाच्या नव्या वसाहती स्थापन झाल्या तेथें नूतन मठवास्तूंची बांधणी, श्रीमठाच्या कक्षेंतील देवमंदिराची डागडुजी व त्या मंदिरांमध्यें नूतन विग्रहांची प्रतिष्ठापना, यज्ञयाग व अनुष्ठानांद्वारे धर्म व धार्मिकतेच्या क्षेत्राचा विस्तार, ठिकठिकाणीं चातुर्मास्य

व्रताचरण करून त्या त्या परिसरांतील समाजवृंदामध्यें कुलदेव व गुरुपीठांवरील श्रद्धा दृढतर करणे आणि संन्यस्त जीवनाचीं सारीं व्रतें कर्तव्यनिष्ठेने पाळून आपली वैयक्तिक अध्यात्म साधना व स्वाध्यायरूपी ज्ञानार्जना महायज्ञ अखंड चालू ठेवला.

विसावें शतक शेवटच्या टप्यांत पोंचत असताना श्रीस्वामीजी श्रीगुरुपीठावर आले व श्रीमठाचा पाया अधिक दृढ व व्यापक बनवून, समाज अधिक संघटित व उन्नत बनवून एकविसाव्या शतकाची संभाव्य आव्हाने पेलण्याची शक्ति त्यांच्यांत विकसित केली. दोन शतकांमधील दुवा बनताना परंपरेशीं फारकत येऊं न देतां बदलत्या युगाच्या बरोबरीने पावले उचलण्यासाठी त्यानी समाजाला योग्य मार्गदर्शन केलें. त्यांच्या या कार्याचा विस्तृत आढावा इतिहास घेईलच.

## स्वाध्याय

पीठावर आल्यापासून सामाजिक व सांस्कृतिक, त्याचप्रमाणें धार्मिक कार्यांचा व्याप सतत विस्तारत राहिला तरी पूज्य श्रीस्वामीजींनी आपली स्वाध्याय साधना अखंड चालू ठेवली. या साधनेचा कळस म्हणजे कल्याणपुर येथें सुरू केलेल्या श्रीमन्न्यायसुधा पाठाची त्याच ठिकाणीं १९९८ मध्ये केलेली यशस्वी परिपूर्ति होय.

पर्तगाळ मठांतील जीवोत्तम वैदिक पाठशाळेची गुणवत्ता वाढवून शिस्तबध्द अभ्यासक्रमाद्वारें विद्यार्थ्यांना वेद, संस्कृत, धर्मशास्त्र, ज्योतिष आदि विषयांचे क्रमबध्द शिक्षण दिलें जातें. या पाठशाळेंतून दरवर्षी सुमारें पन्नास विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करीत असतात. पांच वर्षांच्या अभ्यासक्रमाचें हें गुरुकुल देशभर ख्याति मिळवून बसलें आहें.

मठक्षेत्राच्या पलीकडे जाऊन समाजाचे प्रश्न व त्यांचीं दु:खें ओळखून तीं दूर करण्यासाठीं 'स्वामी द्वारकानाथ विश्वस्त मंडळ' व 'श्री विद्याधिराज धर्मादाय विश्वस्त मंडळ' या दोन धर्मादाय विश्वस्त मंडळांची स्थापना केलेली आहे. शिक्षण, आरोग्य, सामाजिक संस्कार इत्यादि क्षेत्रांत हीं मंडळें समाजाला सहाय्य करीत आहेत.

श्रीमन्न्यायसुधा या ग्रंथाचे रचयते लोकविख्यात श्रीमद् जयतीर्थ गुरु सार्वभौम होत. सुधा ग्रंथ ही त्यांची महामेरु गणावी अशी कृति आहे. जगत्प्रकाशक अशा सूर्याप्रमाणें सज्जनांच्या बुद्धींतून अज्ञानरूपी अंध:कार दूर करण्याचें सामर्थ्य या ग्रंथराजांत आहे.

श्रीवेदव्यासांनी वेदांचे विविध विभाग पाडून त्यांच्या अर्थ निर्णयासाठीं ब्रह्मसूत्रें रचलीं. भगवंताचीं विविध स्वरूप लक्षणें कोणतीं, वेदांपासून कोणता निर्णय करावा, भगवंत हा वेदांच्या सर्व पदांपासून कसा प्रतिपाद्य असतो याचें सयुक्तिक दृढीकरण

करणें हा ब्रह्मसूत्राचा उद्देश होय. या सर्व सूत्रांवर श्रीमध्वाचार्य यांनी भाष्य, अणुभाष्य, न्याय विवरण व अनुव्याख्यान असे चार व्याख्यान ग्रंथ लिहिले. त्यांतील अनुव्याख्यान श्लोकरूपी असून ब्रह्मसूत्राचा अत्यंत प्रौढ विमर्षात्मक ग्रंथ आहे.

सकृत्दर्शनीं श्रीमन्न्यायसुधा ग्रंथाचे अवलोकन करताना इक्षुदंडा प्रमाणे कोणताच रस अनुभवास येत नाहीं. पण मंथन सुरू होतांच त्याच्या दिव्य रसाचा अंनुभव येऊं लागतो. या ग्रंथाच्या अध्ययनाने भारतीय तत्त्वशास्त्राचें अनन्य असदृश्य पांडित्य प्राप्त होत असतें. हा ग्रंथ श्रीकर म्हणजे भौतिक, आध्यात्मिक सकल ऐश्वर्य देणारा आहे अशी मध्वमतानुयायी लोकांची मान्यता आहे.

अशा श्रीमन्न्यायसुधा ग्रंथाचें अनन्यभावें अध्ययन व चिकित्सक परिशीलन श्रीमद् विद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी व्यासंगपूर्वक केलें. तो एक बौद्धिक मंथनाचाच अनुभव होता. त्यातून निघालेलें हलाहल पचवून जीं अमोल रत्नें प्राप्त झालीं, तो गुरुवर्यांनी मिळविलेला ठेवा आहे. या तेजस्वी रत्नांचें ओझरतें दर्शन श्रीगोकर्ण मठाधीशांनी कल्याणपुर येथें दि. ४ जुलै १९९८ रोजीं झालेल्या एका विशेष कार्यक्रमांत भक्तगणांना घडविलें. फलिमारु तथा भंडारकेरी मठाधीश श्रीमद् विद्यामान्यतीर्थ यांच्या चिकित्सक उपस्थितींत श्रीमन्न्यायसुधा मंगल पाठ झाला हें विशेष. तो एक अमृतानुभव होता. श्रीमन्महाभारत तात्पर्यनिर्णय पाठाचा शुभारंभ येथील श्रीवेंकटरमण देवस्थानांत चातुर्मास मुक्कामाच्या वेळीं (१९९६) करण्यांत आला आणि त्याच्या परिपूर्ति नंतर मंकी चातुर्मासाच्या पूर्वसंध्येवर (१९९८) त्याच ठिकाणीं एक विशेष समारंभ आयोजित करण्यांत आला. या समारंभाला उपस्थित विद्वज्जनानी श्रीस्वामीजींचें कार्यपूर्तीबद्दल अभिनंदन केलें.

## यज्ञयाग व इतर धार्मिक कार्ये

गेल्या पंचवीस वर्षांत धार्मिक होमहवनें मठानुयायी वर्गाकडून स्थानिक देवदेवतांच्या सान्निध्यांत पूज्य स्वामीजींच्या उपस्थितींत पार पडलीं. त्यांमध्यें सहस्त्रकुंभ महाविष्णु, महारुद्र, शतचंडी, रक्षात्रय हवन आदि कार्यांचा समावेश आहे.

१. श्रीलक्ष्मीनारायण महामाया देवस्थान, अंकोला येथें अयुतचंडी व सहस्त्रचंडी
२. श्रीपर्तगाळ मठीं सहस्त्रचंडी
३. श्री दामोदर संस्थान जांबावली येथें अतिविष्णु व अतिरूद्र (१९९८)

हार्दिक शुभेच्छा
**नॅशनल कन्वेयर बेल्टिंग कंपनी, झुआरी नगर**

४. कुमठा अतिविष्णु - (१९८१)
५. गुंडबाळा अतिविष्णु - (१९८८)
६. मुंबईंत श्रीराममंदिराच्या प्रांगणांत कोटि रामनाम महायज्ञ, सहस्त्र रजत कुंभाभिषेक, १० दिवसांच्या सोहळ्यांत श्रीकाशी मठाधीश, श्रीकैवल्य मठाधीश व त्यांचे शिष्य, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी, उपमुख्यमंत्री, श्री. गोपीनाथ मुंडे, कर्नाटक राज्याचे बृहत् उद्योगमंत्री श्री. रघुनाथराव देशपांडे यांची उपस्थिति - (१९९७)
७. श्रीरामनाथ देवस्थानांत महासुदर्शन हवन - (१९९९)

## मठ जीर्णोध्दार

| | | |
|---|---|---|
| १. | वारणासी | (१९७५) |
| २. | बसरूर, कारवार, वेंकटापुर | (१९७९) |
| ३. | गोकर्ण | (१९८१) |
| ४. | भटकळ | (१९८१) |
| ५. | पर्तगाळ मुख्यमठ | (१९८४, ८६, ९९) |
| ६. | अंकोला | (१९८८) |
| ७. | मंगळूर (नवग्रह प्रतिष्ठा) | (१९९१) |
| ८. | गंगोळ्ळी | (१९९६) |
| ९. | बेंगळूर येथील लहानशा मठवास्तूचें भव्य वास्तूंत रूपांतर | (१९८५) |
| १०. | वास्को येथें छोटेखानी मठवास्तु शेजारीं बहुमजली वास्तु | (१९९८) |

## नवीन मठवास्तु

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | यल्लापूर | (१९८३) | ५. | बेळगांव | (१९९०) |
| २. | मंकी | (१९८३) | ६. | दाण्डेली | (१९९२) |
| ३. | हुबळी | (१९९६) | ७. | मडगांव | (१९९३) |
| ४. | बद्रिकाश्रम | (१९८९) | ८. | परवरी शिलान्यास | (१९९८) |

हार्दिक शुभेच्छा
गणेश ट्रेडर्स, खोर्लीं, म्हापसा - गोवा

## शाखामठांत कल्याण मंडपांची उभारणी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | भटकळ (श्रीनारायणतीर्थ कल्याण मंटप) | - | १९८१ |
| २. | मंगळूर (श्रीद्वारकानाथ भवन) | - | १९८२ |
| ३. | रिवण (श्रीरामचंद्रतीर्थ मंडप) | - | १९८४ |
| ४. | गंगोळ्ळी (श्रीद्वारकानाथतीर्थ सभागृह) | - | १९८४ |
| ५. | अंकोला (श्रीविद्याधिराज सभागृह) | - | १९८९ |
| ६. | डिचोली (श्रीअणुजीवोत्तमतीर्थ मंडप) | - | १९९६ |

## वृंदावनांचे जीर्णोध्दार

मठ परंपरेंतील यतिवर्यांच्या पुढील वृंदावनांचे जीर्णोध्दार श्री विद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी आपल्या कारकीर्दीत केले.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| भटकळ | (१) | श्री नारायणतीर्थ | - | (१९७४) |
| | (३) | श्री जीवोत्तमतीर्थ | - | (१९७४) |
| पर्तगाळ | (२२) | श्री द्वारकानाथतीर्थ | - | (१९७४) |
| गोकर्ण | (४) | श्री पुरुषोत्तमतीर्थ | - | (१९७७) |
| अंकोला | (७) | श्री दिग्विजय रामचंद्रतीर्थ | - | (१९९०) |
| | (११) | श्री रमाकांततीर्थ | - | (१९९०) |
| | (१४) | श्री भूविजय रामचंद्रतीर्थ | - | (१९९०) |
| वेंकटापूर | (१५) | श्री रमानाथतीर्थ | - | (१९९४) |
| पर्तगाळ | (१६) | श्री आनंदतीर्थ स्वामी | - | (१९९५) |
| | (१३) | श्री श्रीकान्ततीर्थ स्वामी | - | (१९९५) |
| | | श्री नरहरितीर्थ (शिष्यस्वामी) | - | (१९९५) |
| | | श्री व्यासतीर्थ (शिष्यस्वामी) | - | (१९९५) |
| होन्नावर | (८) | श्री रघुचंद्रतीर्थ | - | (१९८८) |
| | (१०) | श्री लक्ष्मीकांततीर्थ | - | (१९८८) |
| डिचोली | (५) | श्री अणुजीवोत्तमतीर्थ | - | (१९९५) |

हार्दिक शुभेच्छा

**मे.नारायण गणेश प्रभु झांटये आणि कंपनी,**

**डिचोली गोवा**

## नूतन विग्रह प्रतिष्ठा

| | | | |
|---|---|---|---|
| १. | वेंकटापुर | - श्री लक्ष्मी व्यंकटेश | |
| २. | रामनाथी | - श्री रामनाथ नूतन लिंग प्रतिष्ठा | |
| ३. | म्हाडदोळ | - देवतांची प्रतिष्ठा | (१९७७) |
| ४. | मादनगेरी | - श्री वीरविठ्ठल प्रतिष्ठा | (१९७८) |
| ५. | मुर्डेश्वर | - श्री लक्ष्मी-वेंकटेश | (१९७७) |
| ६. | माशेल | - श्री देवकीकृष्ण देवप्रतिष्ठा | (१९७९) |
| ७. | बांदोडें | - श्री महालक्ष्मी | (१९९०) |
| ८. | | - श्री नारायण प्रतिष्ठा | (१९९१) |
| ९. | आर्के (मडगांव) | - श्री मारुति प्रतिष्ठा | (१९९२) |
| १०. | खोल (काणकोण) | - श्री लक्ष्मी नारायणाची पुनःप्रतिष्ठा | (१९९८) |
| ११. | कार्गल | - श्री चौडेश्वरी आणि सप्तदेवतांची प्रतिष्ठा | (१९९८) |
| १२. | मादनगेरी | - श्री महालसा सिद्धिविनायक प्रतिष्ठा | (२०००) |

## काशी येथील कार्तिकवास

आमची भरतभूमि! महामहिमान्वित पवित्र भूमि!! स्वर्गसुखाची, मोक्षानंददायक कर्मभूमि!!!

ऋषिमुनींच्या तपाने पुनीत झालेली तपोभूमि. जगाकडून गुरुस्थानी मानण्यात येणारी व हिंदूची मातृभूमि म्हणवून घेणारी हिंदूभूमि. असंख्य पुण्यक्षेत्रांनी समन्वित पुण्यभूमि. ही पुण्यक्षेत्रेंच पवित्र तीर्थक्षेत्रें होत. मर्त्य लोकांना अमरत्व देणारीं ही अमरक्षेत्रं आहेत. या कारणाने आमची अमरभूमि.

भरतभूमींत भरून व्यापलेल्या तीर्थक्षेत्रांमध्ये परमपवित्र 'काशी' क्षेत्राची महिमा अपार आहे. वरणा आणि असि या दोन नदींच्या मध्ये हे क्षेत्र असल्याने त्याला 'वारणासी' असेही म्हणतात. या क्षेत्राला शिवाला सोडून राहता येत नसल्याने 'अविमुक्त क्षेत्र' असेही नाव आहे. 'काशी' या शब्दाच्या केवल नामोच्चाराने ब्रह्महत्यादि पापांचा नाश होतो.

**ब्रह्महत्यादिपापानि यस्या नाम्नोऽपि कीर्तनात्।**
**त्यजन्ति पापिनं काशी सा केनेहोपमीयते।।** (स्कंद पुराण)

हार्दिक शुभेच्छा
**मे. झांटये कॅशूनट इंडस्ट्रीज, मालवण**

काशीच्या दर्शनमात्राने जे अपार पुण्य लाभते, ते पुण्य प्रयागस्नानाने मिळणाऱ्या पुण्यापेक्षा अधिक असते असे विष्णु-शिव दोघेही मानतात.

**प्रयागस्नानपुण्येन यत्फलं स्याच्छिवप्रदम्।**
**काशीदर्शनमात्रेण तत्पुण्यं श्रद्धयास्तु वै।।**
**इति विष्णोर्वरं श्रुत्वा देवदेवो जगत्पतिः।।**
**उवाच च प्रसन्नात्मा तथास्तु मधुसूदन।।** (स्कंद पुराण काशी खंड)

इतर ठिकाणी वर्षभर निवास केल्याने प्राप्त होणारे पुण्य प्रयागमध्ये संपूर्ण माघ मासात वास केल्याने प्राप्त होते. तेवढेच पुण्य काशी क्षेत्रात तीन दिवस राहून गंगा स्नान केल्याने मिळते असे 'महाभारत' वचन आहे.

**संवत्सरशतं साग्रं निराहारस्य यत्फलम्।**
**प्रयागे माघमासेऽत्र त्र्यहः स्नातस्य तत्फलम्।।**

स्कंद पुराणाच्या काशीखंडांत केवल एक रात्र काशीत घालविली तर सकलविध तपःफल प्राप्त होते असे वचन आहे.

**तप्त्वा तपांसि सर्वाणि बहुकालं जितेन्द्रियैः।**
**यत्फलं लभ्यतेऽन्यत्र तत्काश्यामेकरात्रतः।।**

केवल त्रि-रात्री काशीत घालविल्याने निश्चित अनंत पुण्य फलप्राप्ति होते.

**त्रिरात्रमपि ये काश्यां वसन्ति नियतेन्द्रियाः।**
**तेषां पुनन्ति नियतं स्पृष्टाश्चरणरेणवः।।**

काशी क्षेत्रात तीर्थस्नान केल्याने संसारबंधनातून मुक्ति प्राप्त होते असे ब्रह्मपुराण व कूर्मपुराणांत वचन आहे.

**वाराणस्यां महातीर्थे नरस्नात्वा विमुच्यते।।** (ब्रह्म पुराण)
**वाराणसी पुरी सर्वेषां एव भूतानां संसारार्णवतारिणी** (कूर्म पुराण)

मोक्षदायक सप्तपुरी सृष्टीकाली काशीतून बाहेर पडल्या व स्थितीकालात काशीमध्येच असतात व संहारकाली काशीमध्ये लीन होतात असा ब्रह्मवैवर्त पुराणाचा अभिप्राय आहे.

**काश्याः सर्वविसृतः सृष्टिकाले काश्यामेताः स्थितिकाले वसन्ति।**
**काश्यां लीनाः सर्वसंहारकाले ज्ञातव्यास्ता मुक्तपुर्यो भवानि।।**

हार्दिक शुभेच्छा
**कैसरे ट्रेडर्स, फोंडा गोवा**

अशा तऱ्हेचें पापनाशक, मुक्तिदायक काशीक्षेत्र हे मूलतः वैष्णव क्षेत्र आहे, याचे स्मरण ठेविले पाहिजे. हे क्षेत्र आदिकालापासून विष्णु परमात्म्याचे आवासस्थान होय. त्यानंतर शिव येथे वास करिता झाला असा नारदपुराणात उल्लेख आहे.

**आद्यं च वैष्णवं स्थानं पुराणे परिचक्षते।**
**पुरीषु संस्थितो विष्णुरंशैः काश्यां स्वरूपतः।।** (नारद पुराण)
**तमूचुर्मुनयः सूर्य शृणु क्षेत्रं महाफलम्।।**
**सांप्रतं वासुदेवस्य भावि तच्छंकरस्य च।** (वामन पुराण)

आदिकालापासून वैष्णव क्षेत्र असलेल्या काशीत शिवाने येऊन स्थायिक होण्याचे कारण पुराणात वर्णन केलेले आहे. ब्रह्मकपाल हाताला चिकटून यातना भोगणाऱ्या शिवाने यातनेपासून मुक्त होण्याकरिता नानाक्षेत्रांत भटकण्यास प्रारंभ केला. पण ते सर्व व्यर्थ झाल्यावर काशी क्षेत्रात पोहोचला आणि तेथे ब्रह्मकपालापासून मुक्त झाला. परमसंतुष्ट झालेल्या शिवाने काशीतच वास करण्याच्या अपेक्षेने क्षेत्राधिपति बिंदूमाधवाजवळ वासयोग्य स्थळाची याचना करून तें मिळविले. याप्रमाणे शिवाने कार्तिक शुद्ध चतुर्दशी (वैकुंठ चतुर्दशी) च्या दिवशी काशीत वास करिता झाला. या निमित्ताने आजहि प्रतिवर्ष वैकुंठ चतुर्दशीच्या दिवशी काशी विश्वनाथ पालखीत बसूनं पंचगंगा घाटावरील बिंदुमाधवाच्या मंदिरात दोन टोपल्या तुलसी समर्पण विधी आचरतो.

काशी क्षेत्रात भक्ताधिकांना गंगेत उतरून स्नान करण्याकरिता अनुकूल असे अनेक 'घाट' आहेत. मणिकर्णिका, दशाश्वमेध, पंचगंगा वगैरे घाट सुप्रसिद्ध आहेत. हे श्रीरामाने बांधलेले असून त्यांतील पंचगंगा घाट श्रेष्ठ म्हणून तेथे केलेले कार्तिकस्नान अत्यंत पुण्यप्रद असे 'आनंद रामायण' चे वचन आहे.

**तथा चकार रामोऽपि घट्टबंधनमुत्तमम्।**
**दृश्यते प्रत्यहं यत्र काश्यां रामः ससीतया।।**
**चकार पंचगंगायां कार्तिकस्नानमुत्तमम्।**
**काशीवासं स्पर्शमेकं चकार धर्मतत्परः।।** (२-६-३७-३८)

या पंचगंगा (पंचनद) घाटाच्या श्रेष्ठतेला अनेक कारणे आहेत. पहिले कारण याचे नावच अन्वर्थक आहे. येथे पांच पवित्र नद्यांचा संगम असल्याने याला 'पंचनद' अथवा 'पंचगंगा' असे नांव प्राप्त झाले आहे.

हार्दिक शुभेच्छा
**मे. आल्कॉन सिमेंट कं. प्रा. लि.**

**किरणा धूतपापा च पुण्यतोया सरस्वती।**
**गंगा च यमुना चैव पंचनद्यः प्रकीर्तिताः।।**
**अतः पंचनदं नाम तीर्थं त्रैलोक्यविश्रुतम्।**
**यत्राप्लुतो न गृह्णीयाद्देहं ना पांचभौतिकम्।।** (काशी खण्ड)

किरणा, धूतपापा, सरस्वती, गंगा आणि यमुना या पांच पवित्र नद्यांचें मीलन असल्याने 'पंचनद' या नावाने तिन्ही लोकांत प्रख्यात झाले आहे. येथे स्नान करणाऱ्यास पुनर्जन्म नाही.

या प्रत्येक नदीची उत्पत्ति त्याची महिमा सांगते. याचें 'सनत्कुमार संहिते'त विष्णु परमात्माच्या वचनात विवरण आहे.

**यद्दर्शनार्थं गंगापि जाता चोत्तरवाहिनी।**
**तस्यां पंचनदीतीर्थं त्रिषु लोकेषु विश्रुतम्।।**
**मया तत्र तपस्तप्तं प्रस्वेदात्किरणा नदी।**
**गभस्तीशादधोभागे गंगया सह संगता।।**
**धूतपापापि तत्रैव चन्द्रांशक समुद्भवा।**
**रुद्रांशकसमद्भूता स्वयं भागीरथी स्थिता।।**
**विष्णोरंशसमुद्भूता यमुना चत्र संगता।**
**ब्रह्मांशसंभवा यत्र दृश्यते तु सरस्वती।।**
**तीर्थं पंचनदं नाम भूमावेकं विराजते।।**

अर्थात् हिमालयात गंगोत्री पासून निघालेली गंगा नदी पूर्वाभिमुख वाहत असता काशीच्या जवळ येताच पंचगंगा घाटाच्या दर्शनाची अभिलाषा उत्पन्न झाल्याने तिनें उत्तर दिशेला वळसा घेतला. परमात्मा असा मी येथे तपाचरण करीत असताना माझ्या घामाने प्रकट झालेली किरणा नदी सूर्यकिरणाप्रमाणे चमकत गंगेत मीलन पावली. चन्द्रांशसमुद्भूत पापनाशक धूतपापा नदीचे रुद्रांशसमुद्भूत भागीरथीशी मीलन झाले. त्याचप्रमाणे विष्णुचा अंशसमुद्भूत यमुनाचें ब्रह्मांश समुद्भूत सरस्वतीशी मीलन झाले. हाच पंचपवित्र नदीचा संगम होय. परमपवित्र पंचनद तीर्थही हेच.

दुसरे म्हणजे नावानेच सुचविणारा हा पंचगंगा घाट तीर्थराज प्रयागापेक्षाही श्रेष्ठ आहे. कारण प्रयागेत 'त्रिवेणीसंगम' असल्यास, येथे 'पंचवेणीसंगम' आहे. याशिवाय पूर्व दिशेने वाहणारी गंगा उत्तर दिशेने वळण घेतल्याने 'ईशान्यप्लवा' झालेली आहे. नदीचा प्रवाह ईशान्य दिशेला वाहणाऱ्या स्थानी असलेला प्रदेश पवित्र असा मानण्यात येतो. देवालय निर्माण कार्याला तें स्थळ योग्य आहे. असे 'तंत्रसार संग्रहा'चे वचन आहे.

**'प्रागुदक्' प्रवणे देशे कुर्याद्देवालयम् सुधीः ।**

पंचगंगा घाटाचे विशेष महत्त्व म्हणजे येथे विष्णु परमात्मा 'बिंदुमाधव' या नावाने क्षेत्राधिपती होऊन स्थित झालेला आहे. 'बिंदुमाधव' हे नावच परमात्म्याचे भक्तावर असलेले अतिशय प्रेम व वात्सल्याचे सूचक आहे. अग्निबिंदू या नावाच्या भक्ताला प्रसन्न झालेला विष्णु परमात्मा त्याच्या संतोषासाठी त्याचे अर्धे,नांव मिळवून घेऊन 'बिंदुमाधव' असे नाम धारण करून पंचगंगा घाटावर स्थिर झाला. या घाटाची महिमा परमात्म्याने वर्णिली आहे.

**त्वन्नामनोऽर्धेन मे नाम त्वया सह भविष्यति ।**
**बिंदुमाधव इत्याख्या मम त्रैलोक्यविश्रुता ।।**
**काश्यां भविष्यति मुने महापापौघनाशिनी ।।**
**ये मामत्र नराः पुण्याः पुण्ये पंचनदे ह्रदे ।**
**सदा समर्चयिष्यंति तेषां संसारभीः कुतः ।।** (कांशी खण्ड)

हे भक्ताग्रेसर अग्निबिंदो, तुझ्या नांवाचा अर्धा भाग मिळवून मी 'बिंदुमाधव' या नांवाने तिन्ही लोकात प्रख्यात होईन. हे माझे नांव काशीत सकल पापपरिहारक होणारे असेल. परमपवित्र पंचगंगा घाटात स्नान करून तेथे स्थित असलेल्या माझी पूजा करणाऱ्यास संसारभय कधीही बाधणार नाही.

स्कंद पुराणात पंचगंगा घाटाच्या महिमेचे वर्णन असे आहे.

**प्रयागे माघमासे तु सम्यक् स्नातस्य यत्फलम् ।**
**तत्फलं स्याद्दिनैकेन काश्यां पंचनदे ध्रुवम् ।।**
**स्नात्वा पंचनदे तीर्थे कृत्वा च पितृतर्पणम् ।।**
**बिंदुमाधवमभ्यर्च्य न भूयो जन्मभाग्भवेत् ।।**
**यावत्संख्यास्तिला दत्ताः पितृभ्यो जलतर्पणे ।**
**पुण्ये पंचनदे तीर्थे तृप्ति स्यात्तावदाब्दिकी ।।**
**श्रद्धया यैः कृतं श्राद्धं तीर्थे पंचनदे शुभे ।**
**तेषां पितामहा मुक्ता नानायोनिगता अपि ।।**
**तथा पंचनदे तीर्थे यत्किंचिद्दीयते वसु ।**
**कल्पक्षयेऽपि न भवेत्तस्य पुण्यस्य संक्षयः ।।**

अर्थात् प्रयागमध्ये माघमासांत विधिपूर्वक स्नान केल्याने मिळणाऱ्या पुण्याचे फल काशीच्या पंचगंगेत एक दिवस स्नान केल्याने प्राप्त होते. पंचगंगेत स्नान करून पितरांना तर्पण देऊन बिंदुमाधवाची पूजा करणाऱ्यांना पुनर्जन्म नाही. परमपवित्र

पंचगंगेत पितृतर्पणासाठी अर्पित केलेल्या तिळाच्या संख्येएवढे वर्षपर्यंत पितृगण सुखशांति भोगत असतात. पंचगंगेत श्रद्धायुक्त तीर्थश्राद्ध आचरण करणाऱ्याचे पितामह गण कोणत्याहि योनीत असले तरी मुक्त होतात. या पंचगंगा तीर्थस्नानी केलेल्या दानाने जे पुण्य प्राप्त होते ते कल्पक्षयानंतरही क्षीण होत नाही.

"किरणा, धूतपापा, सरस्वती, गंगा व यमुना ह्या मला पवित्र करोत" अशी प्रार्थना करीत पंचगंगेत तीर्थस्नान करावे असे 'सनत्कुमार संहिते' चे वचन आहे.

**किरणा धूतपापा च पुण्यतोया सरस्वती।**
**गंगा च यमुना चैव पंचनद्यः पुनंतु मां।।**
**एतान् मंत्रान् समुच्चार्य जलस्नानं समाचरेत्।।** (६-३६)

मोक्षदायक सप्तपुरी काशीत बिंदुमाधव असलेला पंचघाटाचा प्रदेश विष्णुकांची असे म्हणवून घेतो. विष्णुकांचीत शरत्कालात (आश्विन, कार्तिक मासांत) यात्रेला जावे. असे 'ब्रह्मवैवर्त पुराणाचे' वचन आहे.

**बिंदुमाधवपार्श्वस्था विष्णुकांचीति विश्रुता।।**
**शरत्काले विष्णुकांची गन्तव्या प्रत्यहं बुधैः।।**

याप्रमाणे विष्णुकांची असे मानण्यात येणाऱ्या पंचघाटात कार्तिक मासात आचरलेले स्नान-तर्पण-पूजा वगैरे विधी विशेष फल प्राप्त करून देतात. असे 'काशी खंडांत' सांगितले आहे.

**शतं समाः तपस्तप्त्वा कृते यत्प्राप्यते फलम्।**
**तत्कार्तिके पंचनदे सकृत्स्नानेन लभ्यते।।**
**कार्तिके बिंदुतीर्थे यो ब्रह्मचर्यपरायणः।**
**स्नास्यत्यनुदिते भानौ भानुजात्तस्य भीः कुतः।।** (काशी खंड)

अर्थात् कृतयुगात शंभर वर्षे आचरलेल्या तपाचे फल पंचगंगा घाटी कार्तिकात केवळ एक वेळ स्नान केल्याने प्राप्त होते. ब्रह्मचर्य व्रताचे पालन करीत बिंदुमाधवस्थित पंचगंगा घाटी सूर्योदयापूर्वी तीर्थस्नान केले असतां मृत्युभयरहित होतो असे म्हणतात.

**वाराणस्यां पंचनदे त्र्यहं स्नानात्तु कार्तिके।**
**अमी ते पुण्यपुरुषाः पुण्यभाजोऽतिनिर्मलाः।।**

काशीतील पंचगंगेत कार्तिक मासात तीन दिवस स्नान करणारे अतिशय पुण्यवान् होत. शुक्ल त्रयोदशी, चतुर्दशी आणि पौर्णिमा असे हे तीन दिवस. कार्तिक मास प्रारंभ होताच नरकांतील पापात्मे ओरडू लागतात.

**आगते कार्तिके मासे रौरवं नरकं गताः।**
**आक्रोशन्ते तु पितरो वंशेऽस्माकं भविष्यति।।**
**कश्चिद्भाग्यवतां श्रेष्ठो गत्वा पंचनदे शुभे।**
**अस्माकं तर्पणं कुर्यान्नरकार्णवतारकम्।।** (सनत्कुमार संहिता)

ओरडून ते आपली इच्छा प्रकट करीत असतात. "आम्ही नरकात दुःख भोगीत असतो. आता कार्तिक मास प्राप्त झालेला आहे. आमच्या वंशात जन्मलेला एखादा भाग्यशाली पंचगंगा घाटी जावो. तेथे तीर्थस्नान करो. आम्हाला तीलतर्पण देवो व त्या निमित्ताने आम्ही सर्व दुःखद व असह्य वेदनायुक्त अशा या नरकातून मुक्त होऊ".

'सनत्कुमार संहिता' आणखी एक गोष्ट सांगते.

**तीर्थराजादितीर्थानि प्राप्ते कार्तिकमासके।**
**स्नानार्थं पंचगंगां तु समायांति न संशयः।।**
**कृत्वा तु लक्षपापानि स्नात्वा पंचनदे शुभे।**
**बिंदुमाधवमभ्यर्च्य विलयं यान्ति तत्क्षणात्।।**
**जन्ममध्ये सकृदपि स्नानं पंचनदे शुभे** (८-४१)

अर्थात् कार्तिक मास प्रारंभ होताच तीर्थराज प्रयाग वगैरे सकल तीर्थे स्नानाने पुनीत होण्यासाठी पंचगंगेत येतात. पंचगंगेत स्नान करून बिंदुमाधवाची पूजा केल्याने लक्षांतर पापांचा क्षणमात्रात नाश होतो. या कारणाने मनुष्य जन्म धारण केलेल्या प्राण्याने एकदा तरी पंचगंगेत स्नान केलेच पाहिजे.

अशी आहे काशीची श्रेष्ठता! अशी आहे पंचगंगा घाटाची महिमा!! त्यांतही कार्तिक मासाची गरिमा अपार!!!

याच परमपवित्र पंचगंगा घाटावर श्री गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाचा शाखा मठ उभारलेला आहे व ही श्री मठाच्या शिष्यवर्गांना एक अभिमानास्पद गोष्ट होय. विद्यमान् मठाधीश श्रीमद् विद्याधिराज तीर्थ श्रीपाद वडेर स्वामी महाराज जे तपःपूत, व्रतनिष्ठ, अष्टसिद्धि-विभूषित, शिष्यवत्सल, शिष्यवर्गांच्या श्रेयोभिवृद्धिसाठी सतत चिंतनशील व त्यासाठी कठोर व्रतोपवास निरत, व या कारणाने पुण्यसंचयशील आहेत.

'वज्रादपि कठोराणि' या म्हणीप्रमाणे परमपूज्य स्वामी महाराज शिस्तीचे, कठोर, तपोनिष्ठ, असले तरी कोमल स्वभावाचे, मृदु मनाचे, दयासंपन्न व सतत शिष्यश्रेयाभिलाषी आहेत!!

अशा असामान्य व्यक्तित्वाच्या परमपूज्य स्वामी महाराजांनी गेल्या वर्षी कार्तिक मासात काशीच्या पंचगंगा घाटावर असलेल्या स्वमठात वास्तव्य केलें ही गोष्ट खरोखर शिष्यवर्गाच्या सौभाग्याची आहे. तेथे तीर्थस्नान वगैरे विधि शास्त्रोक्त रीत्या आचरून संकल्पित व्रतोपवास निष्ठेने परिपालन केला आहे व हें स्वार्जित पुण्य शिष्यकोटींच्या सुख-शांति-समृद्धि-समाधानासाठी अर्पण केलें आहे. पूज्य श्रीपादांचे सर्व संकल्प समर्पकरीत्या संपन्न होवो व तन्मूलक शिष्यवर्गातील प्रत्येकाची सकलविध उन्नती-प्रगती होवो, अशी श्रीमठाराध्यदैवत श्रीरामदेव-वीरविठ्ठल चरणी भक्तिपूर्वक विनम्र प्रार्थना.

(डॉ. दयानंद नरसिंह शानभाग, धारवाड यानी संकलित केलेली माहिती)

## श्रीविद्याधिराजतीर्थांचा ऐतिहासिक कल्पवास

गंगा, यमुना व सरस्वती या तीन लोकमातांचें संगम क्षेत्र तीर्थराज प्रयाग. भूतलावरील समस्त तीर्थांचा तो अधिपति. वेदकाळापासून या तीर्थक्षेत्राचें महात्म्य ऋषिमुनींनी पदोपदी प्रतिपादलेलें वाचायला मिळतें.

भारतांत तीर्थक्षेत्रें अनेक असलीं तरी प्रयागचें महत्त्व वेगळें आहे. सारस्वत संप्रदायाची जननी मानली जाणारी वैदिक सरस्वती या ठिकाणीं गंगा तथा यमुनेच्या संगमांत गुप्तपणे सामील होत असल्याच्या मान्यतेमुळे सरस्वतीच्या लेकरांसाठी तीर्थराज प्रयाग हे पवित्रतम तीर्थस्थान बनले आहे.

दाक्षिणात्य सारस्वत समाजाचा प्राणरक्षक मानदंड म्हणून गौरविल्या जाणाऱ्या श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या परंपरेंतील विद्यमान तेविसावे गुरुस्वामी परमपूज्य श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर यांनी श्रीमुखसंवत्सरांत मकर मासांत प्रयाग क्षेत्री कल्पवास व्रताचरण केलें तेव्हां समस्त सारस्वत समाजाचे लक्ष पुन्हा एकदां या त्रिवेणी संगमाकडे वळलें.

यापूर्वी श्रीस्वामीजींनी चतुर्धाम (रामेश्वर, बद्रिकाश्रम, द्वारका व जगन्नाथपुरी) यात्रा केली तेव्हां सारस्वत समाज बांधवांना गुरुसमवेत तीर्थाटन करण्याची संधि प्राप्त झाली होती. स्वामीजींनी सप्तमोक्षपुरीची - अयोध्या, मथुरा, माया (हरिद्वार), काशी, कांची, अवंतिका (उज्जैन) व पुरी- दिग्विजयी यात्राहि शिष्य परिवारासह वैभवाने पूर्ण केली होती. किंबहुना गुरुपीठावर आल्यापासून श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी आसेतु-हिमाचल देशाटन करून देवदैवतांचें संदर्शन व विविध तीर्थस्थानांमध्यें शास्त्र संमत पूजाअर्चना करून समाजाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे. या सर्व यात्रा करतांना स्वामीजींचा एक कटाक्ष राहिलेला आहे आणि तो म्हणजे श्रीमठ

परंपरेंतील पूर्वस्वामीजींनी केलेल्या सर्व यात्रा संदर्शनाची पुनरुक्ति आपणाकडून व्हावी हा होय.

हिमालयांत बद्रिकाश्रमांत चातुर्मास व्रताचरण करून नंतर अल्पावधींत तेथें मठवास्तू उभारलेल्या परमपूज्य श्रीमद् विद्याधिराजतीर्थांनी प्रयागतीर्थांतील कल्पवासाची योजना कां आंखली हें मठाच्या इतिहासाच्या अभ्यासकांना अज्ञात राहिलेलें नाही. श्रीमठ परंपरेंतील नववे गुरुवर्य श्रीमद् लक्ष्मीनारायणतीर्थ स्वामीजींनी आपल्या कारकिर्दीत आठदां कल्पवास व्रताचरण केलें होतें, ही गोष्टच विद्यामान स्वामीजींना प्रेरणा देती झाली यांत संशय नाही. पण त्या निमित्याने तीर्थराज प्रयागची महति आणि कल्पवास व्रताची पुण्याई सारस्वत समाजाला विदित होऊं शकली.

त्रिवेणी संगमांतील पाण्याची पातळी पावसाळ्यांत व्यापक प्रमाणांत वाढते आणि सारा परिसर जलमय होऊन जातो. प्रयाग क्षेत्रांत महापुराचें पाणी अडविण्याचें काम एका दिशेने भक्कम पुरातन विशाल किल्ल्याचे तट करतात तर दुसरीकडे खास बांधण्यांत आलेले बांध. पावसाळा संपतांच पुराचें पाणी ओसरूं लागतें आणि समुद्रकिनारीं असतें तसें धवल रेतीचें वाळवंट तेवढें शिल्लक राहतें. या वाळवंटांतच कल्पवास व्रताचरण करावयाचें असतें.

धर्मशास्त्रानुसार मकरमासांत, म्हणजे पौष पौर्णिमेपासून माघ पौर्णिमेपर्यंत कल्पवास व्रताचरण करावयाचें असतें. नदीच्या वाळवंटांत त्रिवेणी संगमालगत दृश्य-अदृश्य अशा तिन्ही पवित्र नद्यांच्या प्रवाहाचे नादनिनाद कानी पडतील अशा ठिकाणीं जप-तप, चिंतन-मनन करून भगवद् आराधनेंत एक महिना व्यतीत करावयाचा असतो. नित्य त्रिवेणी संगमांत स्नान व अंखड आराधना करण्यासाठीं देशाच्या विविध भागांतून लक्षावधी साधुसंन्यासी, संतमहंत व श्रद्धाळू भाविक संगमतीरीं एकत्र येत असतात. त्या ठिकाणी पर्णकुटी बांधून महिनाभर व्रताचरण करीत असतात. अशा पद्धतीने व्यतीत केलेला मास हा कल्पासमान असतो, असें धर्मशास्त्र सांगतें. एक हजार चतुर्युगें म्हणजे ४३२ कोटी वर्षें म्हणजेच एक कल्प होय. जीवन-मरणाच्या फेऱ्यांत प्रत्येक प्राण्याला पुनरपि जनन व पुनरपि मरणांचे फेरे ४३२ कोटी वर्षेपर्यंत करावे लागतात व ते पूर्ण होईपर्यंत त्या आत्म्याला सद्गति लाभत नसते. मात्र कल्पवास व्रतामुळें संचित होणाऱ्या पुण्याईच्या जोरावर जनन-मरणाचे हे फेरे टाळतां येतात.

सन् १९९४ वर्षी प्रयागराज तीर्थस्थानी संगमाजवळ 'जीवोत्तम आश्रम' उभारण्यांत आला आणि त्या पर्णकुटीत परमपूज्य श्रीविद्याधिराजतीर्थांनी २६ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यानचा काळ ध्यान, चिंतन व पूजा-आराधनेंत व्यतीत केला. या

निमित्तानें शेकडों मठानुयायी भाविकांनाहि तीर्थयात्रा करून त्रिवेणी संगमांत स्नान करण्याची व त्या पवित्र ठिकाणी गुरुवर्यांचे आशिर्वाद प्राप्त करण्याची दुर्मिळ संधि लाभली.

कल्पवास यात्रेसाठी परमपूज्य श्रीस्वामीजी श्रीक्षेत्र वारणासीहून प्रयागला गेले आणि तेथून नैमिषारण्य मार्गे वारणासीला परतले. नैमिषारण्य यात्रेची प्रेरणा ही पुरातन ग्रंथांतील त्या स्थळाची महति वाचूनच श्रीस्वामीजींना झाली. प्राचीन काळीं तेथील गगनस्पर्शी विशाल वृक्षांच्या शीतल छायेंत बसून ऋषिमुनि व ज्ञानी तपस्वी तपःसाधना करायचे. ऋषिश्रेष्ठांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या या स्थानाचे दर्शन कल्पवासाहून वारणासीला परततेवेळीं श्रीस्वामीजींनी घेतलें. पण या यात्रेंत श्रीस्वामीजींनी श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ कक्षेतील वारणासी येथील पुरातन मठवास्तूंत वास्तव्य केलें हें विशेष.

वारणासी क्षेत्रीं पंचगंगा घाटावर भव्य जीर्णोद्धारीत मठवास्तू श्रीसंस्थानची पताका डौलाने फडकावीत उभी आहे. वरणा, असि व गंगा या तीन पवित्र नद्यांच्या संगमावर वारणासी क्षेत्र उभे आहे. परंतु पंचगंगा घाटावर गंगा, युमना, सरस्वती, किरणा तथा धूतपापा या पांच नद्यांचा संगम होत असल्यामुळें या तीर्थाला पंचगंगा तीर्थ असें म्हणतात. वारणासींतील तें स्थान पवित्रतम मानलें जातें.

काशी खंडांत असें नमूद करण्यांत आलें आहे की, अग्निबिंदू ऋषीला वर देऊन भगवान विष्णूने बिंदुमाधवाचे रूप घेतलें व ते तेथें प्रादुर्भूत झाले.

**प्रयागे माघमासे तु सम्यक्स्नातस्य यत्फलम्।**
**तत्फलं स्याद्दिनैकेन काश्यां पञ्चनदे ध्रुवम्।।**

(काशी खंड. ५६/११६)

ह्या तीर्थाचें महात्म्य फार मोठें आहे. माघ महिन्यांत प्रयाग येथें महिनाभर स्नान करून मिळणारे पुण्य पंचगंगेंत केवळ एका दिवसाच्या स्नानाने मिळतें.

या तीर्थाचे दुसरें वैशिष्ट्य असें की त्याची तीर्थ देवता विष्णू असून कार्तिक महिना हा स्नानासाठी अनुरूप मास मानला जातो.

अशा पवित्र स्थानी श्रीसंस्थानचा मठ श्रीमठाचे संस्थापक श्रीनारायणतीर्थ यांनीच उभारला होता. विशिष्ट परिस्थितींत काशी नरेशाच्या भक्ति व आदरास तो पात्र ठरल्यावर घाटावर बसून चिंतन करणाऱ्या या सारस्वत मुनीला काशी नरेशांनी तेथें बिंदुमाधव सान्निध्यांत मठ वास्तू उभारण्यासाठीं जागा दान केली.

काशींतील उंच पंचगंगा घाट हें पवित्रतम स्थान मानलें जातें. शिवाय वारणासींत पंचगंगा ईशान्यवाहिनी झालेली आहे. देव मंदिरासाठी जागा निवडतांना ज्या ठिकाणी

जलप्रवाह ईशान्येकडे वळतो तें ठिकाण निवडण्याची शिफारस तंत्रसार संग्रहांत ठळकपणे येऊन जाते.

**प्रागुदक्प्रवणे देशे कुर्याद्देवालयं सुधीः।।**

(श्रीमध्यवाचार्य लिखित तंत्रसारसंग्रह अ ३ - ४५)

या ठिकाणी आद्य मठ उभा झाला तर वैष्णव संप्रदायी सारस्वत समाजाला तो तारक ठरेल ही श्रीनारायणतीर्थांची श्रद्धापांच शतकांच्या इतिहासावलोकनानंतर किती सार्थ होती याची कल्पना करूं शकूं.

श्रीसंस्थानचें मुख्यालय गोव्यांत कुशावती तीर्थी पर्वतरांगांच्या पायथ्याशीं उभारण्याचें श्रेय श्रीमठ परंपरेंतील सहावे स्वामी परमपूज्य श्रीरामचंद्रतीर्थ यांना दिलें जातें. श्रीरामचंद्रतीर्थ काशीयात्रेला गेले असतां प्राचीन मठवास्तूच्या आवारांत पंचगंगा घाटावर चिंतनासाठी बसले होते. मठवास्तूच्या मालकीचा प्रश्न न्यायप्रविष्ट झाल्यामुळें ते उद्विन झाले होते. वारणासी क्षेत्र पवित्रतम असलें आणि तेथील मठवास्तू पुरातन असली तरी समाजाचा भूगोल लक्षात घेतां परशुरामभूमीत मुख्यालयास अनुरूप अशी मठवास्तू उभारण्याची प्रेरणा त्यांना तेथे झाली आणि ज्या ठिकाणी कुशावती नदी सह्याद्रि पर्वतरांगांच्या पायथ्याशी ईशान्यवाहिनी झालेली त्यांना दिसली तेथे त्यांनी पर्तगाळ मठवास्तू उभी केली असें मानण्यास पुरेसे दाखले उपलब्ध आहेत.

पर्तगाळ मठस्थापनेबद्दल अनेक आख्यायिका प्रचलित असल्या आणि त्या निराधार ठरवितां येत नसल्या तरी जागेच्या निवडीमागें ईशान्यवाहिनी जलप्रवाहाचे महात्म्य प्रेरणारूप ठरलें यांत शंकाच नाही.

इतिहासाच्या प्रदीर्घ कालावधींत वारणासी क्षेत्रावर परकी राजवटीच्या जुलमाचीं अभ्रें आलीं, पण गंगेच्या पात्रांत तेहतीस फूट उंचीच्या चबुतऱ्यावर उभा असलेला आमचा मठ सुरक्षित राहिला. तरी या वास्तूवर अनेकांची वक्रदृष्टि अनेकदां गेली. श्रीव्यासतीर्थ शिष्य स्वामीजी विद्याभ्यासासाठीं तेथें गेले असतां आपल्या गुरुवर्यांना त्यांनी पाठविलेला संदेश फारच बोलका आहे. या मठवास्तूवर अनेकांच्या वक्र नजरा फिरून फिरून जात असल्याने गुरुवर्यांनी जातीने त्या मठवास्तूंत अधूनमधून वास्तव्य केल्याशिवाय ती वास्तू सुरक्षित राहणार नाही, या त्यांच्या तगाद्यामुळेंच श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ वारणासीला गेले व तेथील जीर्ण होऊ लागलेल्या मठवास्तूच्या जीर्णोद्धाराचे कार्य त्यांनी सुरू केले. जीर्णोद्धाराचे कार्य पूर्ण होण्यास आठ वर्षे लागलीं. जीर्णोद्धार चालू असतांना श्रीस्वामी वारणासी मुक्कामाला जात होते आणि कल्पवास काळांत प्रयागराजची यात्रा करीत. कल्पवासकाळ पूर्ण होतांच मुख्यालय

असलेल्या श्रीपर्तगाळ मठीं रामनवमीच्या उत्सवासाठी परतण्याचा शिरस्ता असायचा. शेवटच्या यात्रेहून परतत असताना फाल्गुन वद्य ७ मी च्या दिवशीं, रामनवमीला सतरा दिवस असतांना, वार्धक्य व परिश्रमाने थकलेला देह त्यांनी नाशिक तीर्थी गोदावरी तटीं ठेवला. (शके १६२३) त्या स्थानावर श्रीमठाने जमीन संपादन केलेली असून तेथेहि मठवास्तू उभारण्याचा श्रीविद्याधिराजतीर्थांचा मनोदय आहे.

आज पंचगंगा घाटावर जी जीर्णोद्धारित वास्तु उभी आहे, तिचा जीर्णोद्धार विद्यमान गुरुस्वामी श्रीमद् विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर यांनी १९७५ सालीं करविला आणि जेव्हां त्यांनी तेथे वास्तव्य केलें तेव्हां मठानुयायी वर्गालाहि अनायासें वारणासी यात्रा करण्याची सुसंधि लाभली.

## गंडकी यात्रेची संकल्पना

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश प.पू. श्रीविद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजींनी गंडकी शालिग्राम क्षेत्राची ऐतिहासिक यात्रा निर्विघ्नपणे पूर्ण केल्यानंतर या यात्रेची प्रेरणा श्री स्वामीजींना कशी मिळाली हे जाणून घेण्यासाठी पुढील माहिती मदतरुप ठरण्यासाठी आहे.

गंडकी क्षेत्राबद्दल श्री स्वामीजी ऐकून होते. ग्रंथांमध्ये या क्षेत्राचे येणारे उल्लेख व त्याची महती त्यांना माहित होती. कुठे असेल हे गंडकी क्षेत्र? शोध घेता घेता स्पष्ट झाले की शालिग्राम क्षेत्र, शालिग्राम पर्वत अथवा, हरि क्षेत्र या नावाने हा प्रदेश ओळखला जातो. पद्मपुराणात परशुराम चरित्र कथन करण्यात आले आहे. जमदग्नीकडून उपनयन झाल्यानंतर हरिक्षेत्र पर्वतावर जाऊन परशुरामाने कश्यप मुनींकडून मंत्रोपदेश घेतला आणि तेथेच आपली तपसाधना सुरू केली. श्री मठाच्या पर्तगाळ येथील मुख्यालया नजिकच श्री परशुरामाचे सान्निध्य असल्याने परशुरामाने कोवळ्या वयात केलेल्या यात्रेचे स्मरण मनात स्थिरावले. भागवत ग्रंथात श्रीकृष्ण भगवंतांचे बंधू बलराम यांनी केलेल्या विविध यात्रांमध्ये गंडकी यात्रेचाही समावेश आहे.

नेपाळ देशाला देवखोला या नावाने संबोधली जाणारी नदी हीच शालिग्राम शिला. शालिग्रामी आणि नारायणी या नांवांनीही ती ओळखली जाते. त्या संदर्भात संबंधित साहित्याचे परिशीलन करते वेळी श्री दामोदर कुंडाचे महत्त्व मनावर बिंबून राहिले.

१९९३ साली श्री स्वामीजींनी प्रयाग येथे गंगा, यमुना व अदृश्य सरस्वती या नद्यांच्या त्रिवेणी संगमावर कल्पवासानिमित्त महिनाभर वास्तव्य केले. त्या ठिकाणी

स्वतःचा एक आश्रम स्थापन करून त्याला जीवोत्तम आश्रम असे नांव दिले. या वास्तव्यांत आठ वैष्णव महाक्षेत्रांपैकी सात महाक्षेत्रांची यात्रा पूर्ण झाली आणि जाताना राहिले ते मुक्तिनारायण - दामोदर कुंड - चक्रतीर्थ या महाक्षेत्रांचे दर्शन व्हावे अशी इच्छा तीव्रतर झाली.

गिर्यारोहकांच्या माहितीसाठी नेपाळ सरकारने तयार केलेले 'ट्रॅकिंग मॅप' मागवून घेतले. त्या नकाशांत मुक्तीनाथ (३,८०० मीटर्स) दामोदर हिमाल - दामोदर कुंड (५,९१६ मीटर्स) दामोदर लेक (६,०८७ मीटर्स) दर्शविलेले पाहून पुराणकथांमध्ये वर्णित गंडकी यात्रा करण्याचा संकल्प दृढ झाला.

चैत्र शुद्ध द्वितिया हा श्रीस्वामीजींच्या गुरुपीठारोहणाचा दिवस. मठसंस्थापनेचाही तो दिवस आहे. त्याच दिवशी श्री शालिग्राम क्षेत्राची यात्रा करण्याचा निर्धार पक्का झाला. मठानुयायी वर्गाला या यात्रेची कल्पना देण्यासाठी श्री. वासुदेव वसंत शेणवी धेंपे यांच्या अध्यक्षतेखाली १४ डिसेंबर १९९६ रोजी, व नंतर मंकी चातुर्मास व्रताचरणकक्षेत दोनदा अशा बैठका झाल्या. या बैठकांतून श्री शालिग्राम क्षेत्राच्या यात्रेच्या निर्धाराला समाजवृंदाकडून पाठिंबा मिळाला.

मंकी येथील स्वमठांतून प्रयाण घेऊन (६ सप्टेंबर १९९८) पर्तगाळ मठीं पूर्व गुरूवर्यांच्या वृंदावनांची भेट व श्रीप्रभु रामचन्द्र देव सान्निधींत यात्रेच्या सुगमतेसाठी घृतयुक्त दीप प्रज्चलन करून मनोभावें प्रार्थना करून स्वामी महाराज बेळगांव मार्गे मुंबई स्वमठांत पोहोचले. स्वमठांत कांही चिकित्सकांच्या 'दामोदर कुंड' याचा कुठेहि उल्लेख नसलेल्या या स्थळाला प्रयाण घेणाऱ्या स्वामीजींना कांहीतरी भ्रम झाला असावा असा सावधपणाचा विचार ऐकविण्यांत आला. मुंबईवरून वारणासी, गोरखपूर नेपाळातील नारायणगड या गावात वाहत असलेल्या नारायणी नदीच्या परिसरांतील तसेंच पोखरावरून मालडुंगा, बेनी, टिपलिंग, तातोपानी, कालोपानी, कोबांग, तुगचे, जॉनंसन, काकबेनी, चरांग, समर, गेलींग, ह्या गावांत वास्तव्य करीत पुढे जात असतांना मार्गामध्ये भेटणाऱ्या ग्रामस्थ व पांथस्थ लोकांकडे दामोदर कुंडाला पोंचवण्याचा मार्ग विचारल्यास सर्वांकडूनहि आश्चर्यजनक साशंक मनाने दामोदर कुंड अस्तित्वांत नसल्याची उत्तरं मिळत होतीं गेलींग पर्यंत (२२ सप्टेंबर) पोंचलों असलों तरी दामोदर कुंडाला पोचण्याचा संकल्प पूर्ण होईल असा भरवंसा दिसत नव्हता. दि. २३ सप्टेंबरला चरांग गावाला पोचण्याच्या ८ किलोमीटर अगोदर लहानसा गाव असून तेथील डोंगराच्या टेकडीवर पायवाटेच्या डाव्या बाजूला दोन खोल्या व उजव्या बाजूला दोन खोल्या असून त्यावर दामोदर कुंड प्राथमिक शाळा असा फलक पाहिला. दिवसभर मौनव्रत धारण केलेल्या स्वामीजींना दामोदर कुंडाचे नांव शाळेला

दिलेले पाहून दामोदर कुंड अस्तित्वांत असल्याची खात्री पटली. नेपाळ सरकारने प्रसिद्ध केलेल्या नकाशांतहि दामोदर हिमाल, दामोदर कुंड व दामोदर व्हॅली या स्थानांचा उल्लेख असून लोकांकडून मिळत असलेलीं सावधगिरीयुक्त नकारात्मक उत्तरें घेत प्रयाण पुढे नेत असलेल्या स्वामीजींना शाळेचे नामकरण पाहून आनंदित होऊन बेळगांवचे नारायण पै यांना शाळेचा नामफलक दाखवीत दामोदर कुंड प्रत्यक्षांत असल्याचा संतोष व्यक्त केला. त्या क्षणीं दामोदर कुंड पाहण्याची उत्कंठा बलवत्तर झाली. तेथून चरांग, गिमू या अत्यंत खडकाळ व निर्जन प्रदेशांची यात्रा सुरू झाली. दुसऱ्या दिवशी (दि. २४ सप्टेंबर) सकाळी ७ वाजतां प्रयाण घेऊन याराला पोंचलों. याराहून नो मॅन्स लँड सुरू होते. गिमूला येत असतांना बारा तास अखंड चालूनहि मुक्काम गांठतां आला नाही. शुक्लपक्षाचे दिवस होते. (आश्विन शुक्ल चतुर्थी) चन्द्रदर्शन होत नव्हतें. आकाशांत नक्षत्रांचीहि उपस्थिती दिसत नव्हती. सगळीकडे काळाकुट्ट अंधार पसरला होता. रस्ताहि टोकदार दगडांचा बनला होता. त्यावरून अंधारांत चालणें महाकठीण. एखादा दगड पायाखालून घसरल्यास अंग धारदार दगडांनी ठेचून निघायचें भय होते. तरीहि वाटेकरू बरोबर नसतानाहि पुढे चालत राहण्याचा निर्धार झाला होता.

मागच्या बाजूने एक प्रकाश आम्हाला वाट दाखवीत होता. जणू आम्हाला पुढें जायला खुणावत होता. हा एक भव्य-दिव्य आणि अवर्णनीय प्रकाशच आम्हाला साथ देत होता. आमचें मन उत्साहित करीत होता. सात वाजतां श्रीस्वामीजी गिमू येथील शिबिरांत पोचले. त्या दिवशी अखंड चालण्यानें श्रम तर झाले होतेच, शिवाय आठवडाभर अन्नग्रहण न केल्यानें थकवाहि वाटत होता. उंचावरील ठिकाणामुळे हवेत प्राणवायु बेताचाच होता. त्यामुळे झोप लागणे हि कठिण होत होते. झोपलेल्या मनुष्याला अधिक प्राणवायुची आवश्यकता असल्याने अधूनमधून श्वास कोंडल्यासारखे वाटायचें. त्यामुळे उठून बसून श्वास घेऊन संबंध रात्र जागृतावस्थेतच गेली. आणि त्यामुळे दुसरा दिवस (दि. २५ सप्टेंबर) हा प्रयाणाचा दिवस असूनहि विश्रांतीचा दिवस म्हणून मानण्यांत यावा असा स्वामीजींकडून आदेश आला. तब्बल चौदा दिवसांच्या यात्रेचा श्रम घालविण्याचा विचारहि या आदेशांत होता. १४ दिवस स्वामीजींच्या बरोबर अखंडित राहत असलेला ट्रॅवल एजन्सीचा वाटाड्या स्वामीजींची परवानगी न घेतां प्रवासांतील इतरांशी निरोप ठेऊन एकाएकीं सकाळी ९-३० वाजतां खाली निघून गेला.

११ सप्टेंबरपासून १७ सप्टेंबर पर्यंत साथ दिलेल्या २५ नेपाळी शेर्पां पैकी फक्त सात पुढें प्रयाण करीत होते. पंधराव्या दिवशीं ट्रॅकिंग व्यवस्थापकहि निघून

गेल्यावर राहिलेल्या लोकांचा धीर कमी होत चालला. दि. २६ रोजीं संध्याकाळपर्यंत वाट चालत दामोदर कुंडाला पोंचण्याचा दिवस होता.

निर्धाराला श्रद्धा व विश्वासाची जोड देऊन श्रीस्वामीजींनी क्षणभरहि मनाचा उत्साह ओसरूं न देतां श्रीदामोदर कुंड गाठलें.

या साऱ्या रोमहर्षक यात्रेचे अनुभव श्रीस्वामीजींच्या शब्दांत संकलित करण्यांत आले आहेत.

## गंडकी यात्रेचें प्रयोजन व अनुभव

### (श्रीविद्याधिराजतीर्थ यांची एक मुलाखत)

***प्रश्न : तीर्थयात्रेचें प्रयोजन काय असतें?***

**उत्तर :** तीर्थयात्रा हा संन्याशाचा धर्मच असतो. तीर्थयात्रेमुळे इतिहास, भूगोल, लोकजीवन व संस्कृतीची उत्तम ओळख होत असते. मानवी मनाचे नमुने अभ्यासून घेण्याचें तें एक चांगलें साधन असतें. म्हणून अनादिकालापासून या भारत वर्षांत नद्यांची परिक्रमा करण्याची प्रथा चालू आहे.

भारताचा सांस्कृतिक इतिहास तपासून पाहिला तर असे दिसून येईल कीं एकेकाळीं या देशांत शेंकडों राजे होते. राजा-राजांमध्यें लढाया होत. हा खंडतुल्य देश आहे. प्राचीन काळीं भारताचा विस्तार मान सरोवरा पासून महासागरापर्यंत होता. पश्चिमेला द्वारका आणि पूर्वेला थेट ब्रह्मदेशापर्यंत हा देश अखंड भूखंड होता. आजहि तो तसा आहे. परंतु राजकीय सीमारेषा अधिक प्रभावी ठरल्यापासून भारताची अनेक तीर्थे व पवित्र स्थाने परदेशांत राहून गेलीं आहेत. या देशाची संस्कृति कोणी घडवली, येथील तथाकथित निरक्षर जनतेला न्यायनीति व सेवा-त्यागाचे संस्कार कुणी दिले, आसेतु-हिमाचल आपला आहे ही भावना भारतवासीयांच्या मनांत कोणी दृढ केली, भारतीय हृदयांची स्पंदने ओळखून त्यांच्या पुरुषार्थाला, धार्मिकतेला, विधायक संस्कृतीला व उन्नत संस्कारितेला आकार देण्याचें काम साधुसंतानी केलें. राज्यें वेगळीं, भाषा भिन्न, प्रदेशांचा भूगोल-इतिहास वेगळा, वेशभूषा, आहार निंराळे अशा खंडतुल्य देशाला एकत्र ठेवण्यासाठीं लोकमानसांत जें सांस्कृतिक रसायन आवश्यक असतें तें केवळ साधूसंन्याशीच तयार करूं शकले, म्हणूनच तमीळनाडुमधील भारतीयाला गंगा आपल्या मातेसमान पवित्र वाटते आणि हिमालयाच्या हिमाच्छादित शिखरांखालीं रहाणाऱ्या भारतीयांना रामेश्वर हें पवित्र

तीर्थस्थान वाटतें. साधुसंतांनी या यात्रा करून भारतीय मानसाला यात्रेचें महत्त्व पुरविलें. काशीचें गंगाजल कावडींतून रामेश्वराला नेऊन सागरार्पण करण्याची प्रेरणा दिली. गंगोत्री, यम्नोत्री, केदार-बद्री, मान सरोवर सारख्या दुर्गम क्षेत्रांची यात्रा आयुष्यांत एकदां तरी घडावी असें वाटण्याची प्रेरणा दिली. म्हणूनच हा देश भावनिक दृष्ट्या अखंड राहिला. व्यावहारिक दृष्टीनें विचार करतां तीर्थयात्रेचें महत्त्व आजच्या आत्मज्ञानाचें विस्मरण करून घेऊन विज्ञाननिष्ठ बनलेल्या जगाला पटण्यासारखें आहे. तेवढ्या एका उद्देशाने देह कष्टवून तीर्थयात्रा झाल्या तर कुणीच तक्रार करणार नाहीं.

परंतु तीर्थयात्रेचें महत्त्व आत्मज्ञान प्राप्त करण्याच्या दृष्टीने थोडें थोडकें नसतें. नित्य पूजा-उपासना, ध्यान-चिंतन हीं मन निर्मळ करण्याचीं व परमात्म्याच्या सान्निध्याचा अनुभव घेण्याचीं सुलभ साधने आहेत. परंतु मानवी मन व हृदय हीं अद्‌भुत आहेत. मुक्त सुटलेल्या पाऱ्यासारखीं तीं चंचल आहेत. मन स्थिर करण्याची साधना कठोर असते. ज्या ठिकाणीं बाह्य जगताचे आवाज ऐकूं येणार नाहींत अशा नितांत एकांतांत देवस्मरण केल्याने मन निर्मळ होत असतें. आम्ही जेवढ्या तीर्थयात्रा केल्या त्या बाह्य कोलाहलाने गजबजलेल्या वातावरणांतील होत्या. परंतु दामोदर कुंडाची यात्रा ही सर्वार्थाने वेगळी आहे. स्वर्गारोहणाचा तो मार्ग वाटावा इतका रोमहर्षक आहे. अर्थात अत्यंत खडतर व पदोपदीं मृत्यूच्या छायेंतून नेणारा आहे. मनाचें संतुलन ढळलें तर उचललेल्या पावलाचा ठेका चुकतो आणि डावीकडे अथवा उजवीकडे पाय कलल्यास घनघोर दरीमध्ये कोसळण्याचा धोका असतो. समुद्र सपाटीपासून जवळजवळ बावीस हजार फूट उंचीपर्यंत जावें लागत असल्यामुळें प्राणवायुचा अभाव श्वासोच्छ्वास घेण्यास अडचण निर्माण करतो. एकप्रकारें यात्रेकरूच्या साधनेची भगवंताने घेतलेली ती कठोर परीक्षा असते. या साधनेत जो साधक उत्तीर्ण होतो, त्याला अमावास्येच्या काळोख्या रात्रीनंतर ब्राह्ममुहूर्तावर पूर्व दिशेला सुवर्णमयी सूर्यप्रभा दिसूं लागते आणि जेव्हां तो दामोदर हिमालाच्या सान्निध्यांतील दामोदर कुंडाजवळ पोंचतो तेव्हां पूर्व क्षितिजावर उबदार चकाकते किरण चमकूं लागतात. अशावेळीं डोळे मिटून विष्णूस्मरण केलें असतां सूर्याचें तेज व प्रकाश शरीराच्या अणुरेणूंत झिरपत जात असल्याचा अनुभव येतो. सारा देह पिकल्या बोंडांतून सुटलेल्या कापसासारखा हलका होऊन जातो. मनांतील विचार-विकार गळून पडतात आणि एक अद्‌भुत अनुभव येऊं लागतो, त्याचें वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतील, आणि वर्णन केलें तरी त्या अनुभवाची प्रचीति दुसऱ्याला येणें शक्य नाहीं.

*प्रश्न : चक्रतीर्थाचें विशेष महत्त्व कोणतें?*

**उत्तर** : चक्रतीर्थांत स्नान करताना आमच्या बाह्य मनातील स्पंदनें बंद पडलीं. अंतर्मनाचे हृदयवीणेचे झंकार त्यावेळीं सुरू झाले. तें स्वर्गीचे संगीत, भगवान् विष्णूच्या सान्निध्याचा साक्षात्कार देणारें ठरलें. दामोदर कुंड हें भूतलावरील विष्णूचें एक स्थान आहे हें पुराणांत वाचलें होतें. पद्मपुराणांत भगवान् विष्णूनें गंडकी नदीला शालिग्राम शिलेच्या रूपाने आपण तिच्या उदरांत पुत्र बनून सदैव राहीन व भक्तांवर अनुग्रह करीन असा वर दिला होता. त्या पुराण कथेची सार्थकता आम्ही त्याक्षणीं अनुभवली.

एरवीं दामोदर कुंड हें एक लहानसें कुंड आहे. जेथें वनस्पती नाहीं, वृक्ष किंवा झाडें-झुडपें नाहींत. जीवजंतू नाहीं. फक्त खुरटें गवत तेवढें उगवलेलें दिसतें. अशा ह्या कुंडामध्यें दैवी तत्त्व आहे, तें सामान्य स्थितींत माणसाला दिसणार नाहीं. अंतर्मनाच्या चक्षूंद्वारें जेव्हां या परिसराचें दर्शन घडतें, तेव्हां देहबंधन गळून पडून आपलें मन त्या भगवान् तत्त्वाशीं एकरूप होत असतें.

*प्रश्न : तीर्थक्षेत्रांबद्दल आज लोकांचीं मने बदलूं लागलीं आहेत. त्याबद्दल काय वाटतें?*

**उत्तर** : माहीत आहे. आपल्या पुराणांमध्यें, धर्मशास्त्रांमध्यें तीर्थक्षेत्रांचें महत्त्व व महात्म्य वर्णन करणाऱ्या अनेक कथा-आख्यायिका आहेत. सुधारलेल्या जगाला त्या कपोल-कल्पित गोष्टी वाटतात. पाप-पुण्याच्या संकल्पना देखील आज जगानें बदलून टाकल्या आहेत. पुढें जायचें झाल्यास धर्म, अध्यात्म, पुराणें, वेद व उपनिषदें सारीं बाजूला सारून विज्ञानाची कास धरावी असा विचार पुढें येत आहे. दुर्दैवाने आपल्याकडील विचारवंतही त्या विचारांच्या आहारीं जाऊं लागले आहेत. जीवनाची यथार्थता ज्यांना उमगली नाहीं, त्याची ही गोष्ट. सुख म्हणजे विलास व भोग असें मानून भौतिक समृध्दीच्या मृगजलामागें धावणारे हे अविचारी आत्मे आहेत. युरोप-अमेरिकेमध्ये भौतिक समृध्दी आली. विधायक व संहारक अशी वैज्ञानिक शक्ति त्या देशांनी प्राप्त केली. आकाशस्थ ग्रहांवर आरोहण करण्याची कला शोधून काढली. पण या साऱ्या प्रयत्नांत त्या देशांतील लोक मनःशांती गमावून बसले. सुखाची झोप कशी असते हें झोपेच्या गोळ्या घेणाऱ्याला कसें कळणार? व्यथा-वेदनांवर मात कशी करावी हें अंमली द्रव्यांच्या नशेंत बुडून रहाणाऱ्यांना कोण सांगणार? मानवतेच्या, धर्म व धार्मिकतेच्या विनाशाचा हा मार्ग आहे. या भौतिकतेमुळें कुटुंबसंस्था कोलमडून पडली. नात्यागोत्याचें मांगल्य भंगलें. फुटलेली कांच सांधणे कठीण असते.

*प्रश्न : भारतीय समाजाची दृष्टि साफ करण्यासाठी काय करावे लागेल?*

**उत्तर :** भारतीय समाज-मानसाच्या दृष्टीची कांच थोडीशी मलीन झाली तरी अजून अभंग आहे. कारण वाल्मिकी-व्यासांचे संस्कार, वेद-उपनिषदें व पुराणांची शिकवण भारतीय माणसाला पोषण देत आहे.

सुखाची वाट त्यागांतून जाते ही आपल्या धर्माची शिकवण आहे. परमात्म्याच्या नांवानें त्याग करावा- "तेन त्यक्तेन भूंजीथाः" हें उपनिषदांचें वचन आहे.

*प्रश्न : एक कष्टप्रद यात्रा यशस्वी झाली याचें समाधान पू. श्री स्वामीजींना मिळालें काय?*

**उत्तर :** आम्ही पुराणें वाचलीं, धर्मशास्त्रांचें अध्ययन केलें आणि जें वाचलें-जाणलें तें पडताळूनहि पाहिलें. इतिहास, भूगोल, तत्त्वज्ञान, अध्यात्म यांचा इतका नितांत सुमेळ इतरत्र सांपडणार नाहीं. पुराणांत नमूद केलेल्या बहुतेक तीर्थांची आम्ही यात्रा केली. ती धन्यता आगळी-वेगळी. परंतु ज्या दामोदर कुंडाचा, गंडकी नद्यांचा, शालिग्राम क्षेत्राचा गौरवपूर्ण उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्यें आढळला, तें क्षेत्र कुठें आहे, तेथें कसें जायचें, हे प्रश्न मनांत घोळत राहिले. नित्य पूजापाठ, स्वाध्याय, लोकसंपर्क, धार्मिक याग, हवनें आदि उपक्रम चालू असतानाच आणि परंपरागत संन्यस्त धर्माचें पालन करताना दामोदर कुंडाची जिज्ञासा भागविण्यासाठीं शोध-संशोधन अखंड चालू राहिलें. अचानक एके दिवशीं आमच्या मठ परंपरेंतील तिसरे यतिवर्य श्रीजीवोत्तमतीर्थ यांच्या यात्रांच्या नोंदी वाचनांत आल्या. ते सन १५१८ मध्ये गुरुपिठावर आले व सन १५८८ मध्यें मुक्त झाले. या सत्तर वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी आपलें नांव सार्थ केलें. मठाचें नांव उन्नत केलें आणि त्या काळीं अत्यंत दुर्गम अशा यात्रा केल्या. आपल्या तीर्थयात्रांची नोंद त्यांनी तीर्थावळ या आपल्या काव्यांतून सूचक, बोधक शब्दांमध्यें लिहून ठेवली आहे. सदेह वैकुंठाला गेलेले यतिवर्य अशी त्यांच्या बाबतींत आख्यायिका सांगितली जाते. महानिर्वाणाच्या वेळीं सोंदे मठाचे वादिराजतीर्थ यांना ते वैकुंठाला जात असल्याचा भास झाला होता. या गोष्टीचा भक्तगण आवर्जून उल्लेख करतात. त्या आख्यायिकेमध्ये तथ्य किती आहे याची छाननी करण्यांत अर्थ नाहीं. पण एवढी गोष्ट खरी कीं श्रीजीवोत्तमतीर्थ त्या योग्यतेचे होते.

जर साडेचारशें वर्षांपूर्वी श्रीजीवोत्तमतीर्थ गंडकी यात्रेची यशस्वी परिपूर्ति करूं शकले, तर आपणहि ती केलीच पाहिजे असें आमच्या मनानें घेतलें आणि यावर्षी तो योग जुळून आला.

*प्रश्न : पूज्य श्रीस्वामीजींची प्रकृति नाजूक असताना ही यात्रा घडली. यात्रेचा प्रकृतीवर कांही परिणाम झाला काय?*

**उत्तर :** आमची प्रकृति नेहमी नाजूक राहिली आहे. पाठकण्याच्या मणक्यांना झालेल्या इजेमुळें दोन्ही पायांची शक्ती बरीच घटली आहे. बसलों तरी वेदना, पहुडलों तरी वेदना, अशी ती अवस्था. वेदनाशामक औषधें सेवन करण्यास आम्ही स्पष्टपणे नकार दिलेला आहे. समाजासाठी देवगुरुच्या साक्षीने ज्या संन्यस्त व्रताची दीक्षा घेतली, त्याच्या साऱ्या यमनियमांचें कांटेकोर पालन व्हावे असा आमचा आग्रह. त्याबाबत तडजोड करणे ही आत्मवंचना ठरेल. संन्यास दीक्षेनंतर विशेषतः गुरुपीठारोहण झाल्यानंतर नित्यपूजा व नैमित्तिक यज्ञयाग-अनुष्ठानें क्रमप्राप्त झालीं आहेत. शिखरकलशप्रतिष्ठा देखील करावी लागते. पीठाधीश या नात्याने या कर्तव्यांत कसूर ठेवतां येत नाहीं.

सुरवातीला आम्ही पाठकण्याच्या वेदना सुसह्य व्हाव्यात म्हणून पहुडलेल्या अवस्थेंत कांही काळ पूजा केली. सभा-संमेलनामध्ये देखील अशा अवस्थेंत आशिर्वचनपर भाषणें देखील केलीं. परंतु मागाहून आम्हाला अशी प्रचीति आली, संकल्पाला निर्धाराची जोड मिळाली आणि भगवंताची कृपादृष्टि राहिली तर तो संकल्प सिद्धीस जात असतो. वेदना कमी झाल्या किंवा प्रकृति सुधारली अशांतला भाग नव्हे. आमच्या अंदाजाप्रमाणे पायांची शक्ती मंद होत राहिली आहे. तरी देखील नित्य पूजापाठ, मठाधीश या नात्याने पार पाडावयाचीं कर्तव्यें, यज्ञयाग, अनुष्ठानें, देवप्रतिष्ठा समारंभ, शिखर प्रतिष्ठा आदि कार्यक्रमांना आम्ही सहर्ष हजर राहात असतों. समाजासाठी जीवन अर्पण करायचे तर समाजाच्या अपेक्षानाही उतरावे लागतें. कर्ता करविता भगवंत आहे. त्याची इच्छा असेल तें कार्य ही आमच्या हातून घडेल हा विश्वास मनात दृढ होत गेला.

तीर्थाटने व खडतर यात्रा करण्याची प्रेरणा आम्हाला संतवचनातून मिळाली. संतवचने फार बोधक, वेधक व सुरेख असतात. देवकृपेने पंगू देखील पर्वत पार करीत असेल तर आम्ही मागे कां रहावें? आमच्या सत्प्रवृत्तीला भगवंताचे अधिष्ठान आहे असें आम्ही मानतो आणि त्या भावनेनेच क्लेश वेदना बाजूला सारून कर्तव्यपूर्तीच्या कामासाठी तत्परतेने पुढे सरसावतों.

वैद्यकीय अहवाल तितकेसे उत्साहवर्धक नाहींत. जो देह धारण केला, त्या देहाचे भोग चुकणार नाहींत; परंतु आत्मबळ नांवाच्या तत्त्वांची जी वास्तु असते तिची शक्ती अलौकिक असल्याचा अनुभव आम्ही घेत आहोंत. हा आत्मप्रौढीचा प्रकार नव्हे. तुमच्या प्रश्नाचें सरळ व प्रांजळ उत्तर आहे. हा ही एक यज्ञच.

भगवंताची इच्छा असेल तोवर प्रज्वलित राहील. आपला संकल्प कच्चा राहिला, निर्धार कमी पडला असें घडूं नये एवढीच तळमळ असते.

*प्रश्न : दामोदर कुंड व चक्रतीर्थ या नांवाने सुविख्यात असलेल्या या कुंडाचें वैशिष्ट्य तें कोणतें? भारतांत देशभर अशीं असंख्य कुंडें असताना एका लहानशा कुंडांत स्नान करण्यासाठीं एवढा आटापिटा कां करावा?*

उत्तर : (स्वामीजी क्षणभर गंभीर) सकृत्‌दर्शनी तुमच्या म्हणण्यांत तथ्य आहे, कारण ज्यांना कुंडांत स्नान करावयाचें आहे त्यांच्यासाठीं असंख्य कुंडें उपलब्ध आहेत. राहत्या घराच्या मागें देखील असें एखादें कुंड असूं शकेल, जेथें पावसांत पाणी सांचत असेल किंवा भूगर्भांतील निर्झरामुळें त्या कुंडांत स्वच्छ पाणी रहात असेल. परंतु त्या कुंडाला दामोदर कुंडाची सर कशी येणार? दामोदर कुंड म्हणजे केवळ एक जलाशय नव्हे. तें कुंड हिमालयाच्या दुर्गम भागांत आहे एवढ्याचसाठीं त्याला महत्त्व प्राप्त झालें अशांतलाहि भाग नाहीं. हिमालयाच्या परिसरांत नद्या, नाले व कुंडें यांचा तुटवडा नाहीं. या साऱ्या जलाशयाचे महत्त्व समान नसते. दामोदर कुण्डा मागे कथा-अख्यायिका असंख्य आहेत. अशा आख्यायिकांच्या सत्यासत्यते बद्दल आम्हाला वाद घालायचा नाही. एक गोष्ट खरी कीं प्राचीन ग्रंथांनीं आणि पुराणांनीं भगवान् विष्णूच्या भूतलावरील निवासाशीं या कुण्डाची सांगड घातलेली आहे, ते विनाकारण मानण्याचे कारण नाही. पण क्षणभर तो मुद्दा जरी बाजूला ठेवला तरी अनादी कालापासून या कुंडामध्यें सहस्रावधि भक्तांच्या श्रद्धा व भावना एकरूप झालेल्या आहेत. त्यामुळें आपोआपच दामोदर कुंडामध्यें दिव्यत्वाचा अंश विकसित होऊं शकला.

उदाहरणार्थ, देवालयामध्यें देवाची मूर्ति स्थापन करून आपण तिची पूजा-अर्चा करतों. खऱ्या देवाचें दर्शन कुणी घेतलें आहे? तो सर्वव्यापी असूनहि निराकार व अदृश्य आहे. देव प्रतिमेंत, मग ती प्रतिमा आकृतीच्या स्वरूपांत असो अथवा लिंगाच्या रूपांत, आपण दिव्यत्व पहातों. एरव्हीं ज्या धातू, शिळा अथवा काष्ठापासून देवप्रतिमा बनविलेली असते, अशीं अगणित काष्ठें, शिळा व धातू सर्वत्र विखुरलेले आहेत. मग देवळांत जाऊन देवप्रतिमेची पूजा आपण कां करतों? कारण त्या प्रतिमेची धर्मशास्त्रानुसार प्रतिष्ठापना झालेली असते. हजारों लोक सहस्रावधि वर्षें त्या प्रतिमेला आपली श्रद्धा, भक्ति अर्पण करीत असतात. म्हणूनच मंदिराच्या

हार्दिक शुभेच्छा
**युनिव्हर्सल इंजीनियरींग, मडगांव**

परिसरांतील वातावरणांत चैतन्य येत असतें आणि दिव्यत्वाची तेथें प्रचीति येते. इतर धातूंमध्यें असा दिव्यत्वाचा अंश नसतो. म्हणूनच दुर्गम भागांतील देवमंदिरांत जाण्याचें धाडस भक्त करतात. ज्यांच्या हृदयाला अशा दिव्यत्वाचा साक्षात्कार घडूं शकतो त्यांना दामोदर कुंडाचें महत्त्व आपोआप पटतें. या अनुभवाने जाणून घेण्यासारख्या गोष्टी आहेत.

चार भिंती उभारून त्यावर कौलें चढवलीं म्हणून तें घर होत नाहीं, निवास होत नाहीं. तर त्यांत एकमेकांशीं प्रेमाने वागणारीं माणसें रहावीं लागतात. त्या माणसांच्या मनांत त्या निवासाबद्दल भक्ती, आदर असावा लागतो; तेव्हांच तो निवास ह्या नांवास पात्र होतो. नुसतें कुंड असलें व त्यांत पाणी असलें म्हणून तें पवित्र कुंड ठरत नसतें, तर भक्तांची त्यावर श्रद्धा असावी लागते; तेव्हांच तें पवित्र कुंड ठरतें. दामोदर कुंडाचेंहि असेंच आहे. अनादि काळापासून लोक त्याला पवित्र मानत आले आहेत.

***प्रश्न : कांही आगळे वेगळे अनुभव?***

**उत्तर :** अनेक आहेत. यात्रेमध्यें जेव्हां जीवसृष्टी व वनस्पतीसृष्टी यांच्यापासून मुक्त अशा प्रदेशांतून संचार होऊं लागला तेव्हां एके दिवशीं एक विलक्षण संकट समोर उभें राहिलें. आकाशांतून मोठाल्या गारा झडूं लागल्या आणि वातावरणांत तुफान आलें. एका दिवसाच्या वाटेवर दामोदर कुंड असताना आलेलें हें संकट पाहून स्थानिक वाटाडे व मदतनीस माघारी परतले. निष्ठावंत सहयात्री आमच्या आज्ञेची वाट पहात होते. आम्ही क्षणभर ध्यानस्थ बसलों. येथपर्यंत येऊन रिक्त हस्तें परत यायचें काय? यात्रेला निघताना श्रीरामदेवाने निष्कलंक अभयाचा शब्द दोनदां दिला होता, तो निरर्थक ठरणार काय? काय व्हायचें तें होवो, यात्रेंत खंड पडायचा नाहीं. असा कौल आमच्या मनानें दिला. या यात्राकाळांत आम्ही मौनव्रताचें पालन करीत होतों. सहयात्रींना हातानेच पुढील मार्गक्रमण करण्याची सूचना दिली आणि आम्ही उठलों. तत्क्षणीं एक दैवी साक्षात्कार झाला. तो भास होता, अंतर्मनाचा कौल होता कीं विष्णु परमात्म्याचा दिलासा होता हें सांगतां येत नाहीं. पण आदेश स्पष्ट होता. "यतिश्रेष्ठा, ज्या निष्ठेने व श्रद्धेने आणि ज्या जिद्दीने व ध्यासाने आपण येथवर आलांत, ती साधना व्यर्थ जाणार नाहीं. पुढे जा. तुमच्या यात्रेची परिपूर्ति निर्विघ्नपणें होईल."

हार्दिक शुभेच्छा
**मे. बालाजी व्हाय. एन्. करमली**

आम्हाला कठोपनिषदांतील वचनाचें स्मरण झालें.

**"उत्तिष्ठित, जागृत प्राप्य वरान् निबोधत**
**क्षूरस्य धारा निषिता दुरत्यया**
**दुर्गं पथस् तत् कवयो वदन्ति।।"** (कठोपनिषत् १.३.१४)

त्याच उपनिषदामध्ये आणखी एख श्लोक आहे. त्याचेंहि मनांतल्या मनांत स्मरण केलें.

**"विज्ञानसारथिरथिर्यस्तु मनःप्रग्रहवान् नरः।**
**सोऽध्वनः पारम् आप्नोति तद् विष्णोः परमं पदम्।।**
(कठोपनिषद् १.३.९)

गिमू खिंड पार केली, तेवढ्यांत ईशान्येकडील आभाळ निरभ्र होऊं लागलें. अचानक अंगावर आकाशांतून अक्षता झडल्या. साबुदाण्याच्या आकाराचे ते बर्फाचे गोळे अंगावर झेलताना पुनित-पावन झाल्याचा... संकट टळल्याचा भास झाला. मन निश्चिंत झालें. कृष्णमेघाच्या कडा चकाकल्या. सोनेरी सूर्यकिरण हिमाच्छादित पर्वत शिखरांवरून परावर्तित होऊन आसमंत प्रसन्न करते झाले. देवधामांतील दीप प्रज्वलित झाले होते. आणि अहो आश्चर्यम्! आकाशांतून पुष्पवृष्टीहि झाली. तुंब्याच्या सारखीं शुभ्रधवल, नाजूक, कोमल फुलें अंगावर झेलतां झेलतां अदृश्य व्हायचीं. एकहि फूल बोचलें नाहीं. आम्ही मनोमन श्रीविष्णूचें स्मरण केलें. जणूं वैकुंठ... भगवान विष्णूच्या हृदय मंदिराचें महाद्वार सताड खुलें झालें होतें.

दामोदर कुंडांत प्रवेश करून जगन्नियंत्या सूर्यनारायणाला अर्घ्य अर्पण केलें. श्रीमठाराध्य देवप्रतिमेस अभिषेक पूजा केली आणि मठपरंपरेंतील बावीसहि स्वाम्यांचें उत्कटतेनें स्मरण झालें. श्रीधर आचार्य शेजारींच होते. आमच्या मनांतील भावना त्यांनी जाणल्या आणि मुक्त कंठाने गुरुपरंपरा स्तोत्राचें अस्खलित पठण केलें. एक एका गुरुवर्यांची आकृति मनःचक्षूंसमोरून सरकत राहिली आणि जेव्हां पठण थांबलें, तेव्हां निरव स्तब्धता आसमंतांत पसरली.

परतीच्या प्रवासांत संत तुकारामाची कधींकाळीं कानावरून गेलेली अभंगवाणी आमच्या मनांत निनादूं लागली...

**जेथें जातो तेथें तू माझा सांगाती। चालविसी हाती धरोनियां।।**

# तीर्थक्षेत्रांचें संदर्शन

श्रीगंडकी शालिग्राम क्षेत्राशिवाय श्री विद्याधिराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी यांनी संदर्शन केलेलीं तीर्थस्थळें.

| | | |
|---|---|---|
| पंढरपुर | राजमहेन्द्रि - | जनार्दन |
| कोल्हापुर | विशाखापट्टणम् | कालडि |
| नासिक | अहोबल | गुरुवायुरु |
| सोमनाथ द्वारका | शिवकांचि | पळनि |
| मातृगया, बेटद्वारका | विष्णुकांचि | बेंगळूर |
| प्रभासक्षेत्र, पुष्कर | तिरूवणामलै | महाबलिपुरं |
| जयपुर | तिरूक्कोयिलूर | मद्रास |
| वृन्दावन - गोकुल | श्रीमुष्णं | मुंबई |
| मथुरा | चिदंबरम् | अयोध्या |
| आग्रा | कुंभकोणम् | रांचि |
| देहली | तंजाऊरु | बेजवाड |
| श्री बदरीनाथ | श्रीरंग | तिरुपति - कालहस्ति |
| हरिद्वार - हृषिकेश | रामेश्वरम् | बडोदा |
| नैमिषारण्य - शुकस्थळ | नवपाषाण - दर्भशयन | कुरुक्षेत्र |
| अलाहाबाद - प्रयाग | मानामधुरै | उज्जयिनी |
| वारणासी | मधुरै | उडुपि |
| विष्णुगया, बुद्धगया | तोताद्रि | पाजक |
| जगन्नाथपुरी | कन्याकुमारी | कोल्लूर |
| कोणार्क - साक्षिगोपाल | सुचींद्रं - त्रिवेंद्रम | सुब्रह्मण्य |
| भुवनेश्वर | तिरुवनंतपुरम् | |

☆ ☆

हार्दिक शुभेच्छा
**वेस्टर्न इंडिया सर्विस सेंटर, मडगांव गोवा**



AGURSAL OU PALACIO DO SUAMY EM PARTAGAL

SRI PARTHAGALI MUTT RENOVATED BY H.H. SHRIMAD ANANDA TIRTHA SHRIPADA VADER SWAMIJI IN THE YEAR 1809